भारत सरकार
विधि व न्याय मंत्रालय

# शस्त्र अधिनियम, १९५९

(१९५९ चा अधिनियम क्रमांक ५४)

[ दिनांक १ मार्च १९९१ रोजी यथाविद्यमान ]

# The Arms Act, 1959

## ( Act No. 54 of 1959)

[As in force on 1st March 1991]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने
मुद्रित व प्रकाशित केले.
१९९२
[ किंमत : रुपये ४.३० ]

## प्रावकथन

या आवृत्तीत, दिनांक १ मार्च १९९१ रोजी यथाविद्यमान असलेला आर्म्स ॲक्ट, १९५९ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड २, अंक १ दिनांक २७ मार्च १९९१ यात पृष्ठ २९ ते ४७ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :
दिनांक २७ मार्च १९९१.

व्ही. एस. रमा देवी
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Arms Act, 1959 as on the 1st March 1991 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the Gazette of India, Extraordinary Part XII, Section 1, No. 2, Vol. 1, dated 27th March 1991, on pages 29 to 47.

This authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi :
Dated 27th March 1991.

**V. S. RAMA DEVI,**
Secretary to the Government of India.

एच ४४८०—१

# शस्त्र अधिनियम, १९५९

## कलमांचा क्रम

कलमे

### प्रकरण १ ले

#### प्रारंभिक


१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.
२. व्याख्या व निर्वचन.


### प्रकरण २ रे

#### शस्त्रे व दारूगोळा यांचे संपादन, कब्जा, निर्मिती, विक्री, आयात, निर्यात व वाहतूक


३. अग्निशस्त्रे व दारूगोळा संपादन करण्यासाठी व कब्जात ठेवण्यासाठी लायसन.
४. विवक्षित प्रकरणी विनिर्दिष्ट वर्णनाची शस्त्रे संपादन करण्यासाठी व कब्जात ठेवण्यासाठी लायसन.
५. शस्त्रे व दारूगोळा यांची निर्मिती, विक्री इत्यादींसाठी लायसन.
६. बंदुका आखूड करण्यासाठी किंवा नकली अग्निशस्त्रांचे खऱ्याखुऱ्या अग्निशस्त्रांमध्ये रूपांतर करण्यासाठी लायसन.
७. मनाई केलेली शस्त्रे किंवा दारूगोळा यांचे संपादन किंवा कब्जा अथवा निर्मिती किंवा विक्री यांस मनाई.
८. ओळखचिन्हे अंकित नसलेल्या अग्निशस्त्रांची विक्री किंवा हस्तांतरण करण्यास मनाई.
९. अल्पवयीन व्यक्ती व अन्य विवक्षित व्यक्ती यांनी अग्निशस्त्रे इत्यादी संपादन करण्यास किंवा कब्जात ठेवण्यास किंवा त्यांना ती विकण्यास किंवा त्यांच्याकडे ती हस्तांतरित करण्यास मनाई.
१०. शस्त्रे इत्यादी आयात व निर्यात करण्यासाठी लायसन.
११. शस्त्रे इत्यादींच्या आयातीस किंवा निर्यातीस मनाई करण्याची शक्ती.
१२. शस्त्रांच्या वाहतुकीवर निबंध घालण्याची किंवा त्यास मनाई करण्याची शक्ती.


### प्रकरण ३ रे

#### लायसनांसंबंधीचे उपबंध


१३. लायसने मंजूर करणे.
१४. लायसने नाकारणे.
१५. लायसनाचा कालावधी व नूतनीकरण.
१६. लायसनाची फी इत्यादी.
१७. लायसनांमध्ये बदल, त्यांचे निलंबन व प्रत्याहरण.
१८. अपीले.


### प्रकरण ४ थे

#### शक्ती व प्रक्रिया


१९. लायसन इत्यादी हजर करण्याची मागणी करण्याची शक्ती.
२०. संशयास्पद परिस्थितीत शस्त्रे इत्यादी नेणाऱ्या व्यक्तींना अटक करणे.
२१. कब्जा कायदेशीर असण्याचे बंद झाल्यावर शस्त्रे इत्यादींचा निक्षेप.
२२. दंडाधिकाऱ्याने झडती घेणे व सक्तीने ताब्यात घेणे.
२३. शस्त्रे इत्यादींसाठी जलयाने, वाहने यांची झडती.
२४. केंद्र शासनाच्या आदेशान्वये सक्तीने ताब्यात घेणे किंवा अडकवून ठेवणे.
२४क. शांतताभंग झालेली क्षेत्रे इत्यादींमध्ये अधिसूचित शस्त्रे कब्जात बाळगण्यास मनाई.
२४ख. शांतताभंग झालेली क्षेत्रे, इत्यादींमधील सार्वजनिक ठिकाणे किंवा त्यामधून अधिसूचित शस्त्रे घेऊन जाण्यास मनाई.


### प्रकरण ५ वे

#### अपराध व शास्ती


२५. विवक्षित अपराधांबद्दल शिक्षा.
२६. चोरटे व्यतिक्रमण.
२७. शस्त्रे इत्यादी वापरण्याबद्दल शिक्षा.
२८. विवक्षित प्रकरणी अग्निशस्त्रांचा किंवा नकली अग्निशस्त्रांचा वापर करण्याबद्दल व ती कब्जात ठेवण्याबद्दल शिक्षा.

२९. लायसन धारण न करणाऱ्या व्यक्तीकडून शस्त्रे इत्यादी जाणीवपूर्वक खरेदी करणे किंवा शस्त्रे इत्यादी कब्जात ठेवण्यास हक्कदार नसलेल्या व्यक्तीकडे ती जाणीवपूर्वक सुपूर्द करणे याबद्दल शिक्षा.
३०. लायसन किंवा नियम यांचे व्यतिक्रमण करण्याबद्दल शिक्षा.
३१. नंतरच्या अपराधांबद्दल शिक्षा.
३२. अधिहरण करण्याची शक्ती.
३३. कंपन्यांनी केलेले अपराध.

## प्रकरण ६ वे

### संकीर्ण

३४. शस्त्रे वखारीत ठेवण्यासाठी केंद्र शासनाची मंजुरी.
३५. विवक्षित प्रकरणी परिवास्तूच्या ताबाधारक व्यक्तींची अपराधविषयक जबाबदारी
३६. विवक्षित अपराधांबाबत माहिती द्यावयाची.
३७. अटक व झडत्या.
३८. अपराध दखली असावयाचे.
३९. विवक्षित प्रकरणी जिल्हा दंडाधिकाऱ्यांची पूर्वमंजुरी आवश्यक.
४०. सद्भावपूर्वक केलेल्या कृतीला संरक्षण.
४१. सूट देण्याची शक्ती.
४२. अग्निशस्त्रांची गणती करण्याची शक्ती.
४३. प्रत्यायोजित करण्याची शक्ती.
४४. नियम करण्याची शक्ती.
४५. विवक्षित प्रकरणी अधिनियम लागू व्हावयाचा नाही.
४६. १८७८ चा अधिनियम क्रमांक ११ याचे निरसन.

# शस्त्र अधिनियम, १९५९

## (सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ५४)[1]

(दिनांक १ मार्च १९९१ रोजी यथाविद्यमान)

[ २३ डिसेंबर, १९५९]

**शस्त्रे व दारूगोळा यांच्याशी संबंधित असलेला कायदा एकत्रित व विशोधित करण्यासाठी अधिनियम**

भारतीय गणराज्याच्या दहाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

### प्रकरण १ ले

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास 'शस्त्र अधिनियम, १९५९' असे म्हणावे. संक्षिप्त नाव,

(२) याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे. विस्तार व प्रारंभ.

(३) केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा[2] दिनांकास तो अंमलात येईल

२. (१) या अधिनियमात, संदर्भामुळे अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या व निर्वचन.

(क) "संपादन" याचे व्याकरणिक रुपभेद व सजातीय शब्दप्रयोग धरून त्यामध्ये, भाड्याने घेणे, उसनवार घेणे, किंवा देणगी म्हणून स्वीकारणे या गोष्टी अंतर्भूत आहेत;

(ख) "दारूगोळा" याचा अर्थ, कोणत्याही अग्निशस्त्रांसाठी लागणारा दारूगोळा असा असून, त्यात पुढील गोष्टींचा समावेश होतो :—

(एक) अग्निबाण, बाँब, स्फोटगोळे, कुलपी गोळे व [3][अन्य क्षेपणास्त्रे; ]

(दोन) टॉर्पेडो वापरणे व पाण्याखाली सुरुंग पेरणे यासाठी बनवलेल्या वस्तू;

(तीन) स्फोटक, स्फूर्जक किंवा विखंडनीय सामग्री किंवा अपायकारक द्रव, वायू किंवा अशी अन्य वस्तू—मग ती अग्निशस्त्राबरोबर वापरण्याजोगी असो वा नसो—ज्यामध्ये आहे किंवा आत राहू शकेल अशा रीतीने बनवलेल्या किंवा तदनुकूल बदल करून घेतलेल्या अशा अन्य वस्तू;

(चार) अग्निशस्त्रांतील बार आणि अशा बारांसाठी सहायक वस्तू;

(पाच) पलिते व घर्षणनलिका;

(सहा) दारूगोळ्याचे भाग व तो तयार करण्याची यंत्रसामग्री; आणि

(सात) केंद्र शासन, याबाबतीत शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशी दारूगोळ्याची घटकद्रव्ये;

(ग) "शस्त्रे" याचा अर्थ, हल्ल्याची किंवा बचावाची आयुधे म्हणून बनवलेल्या किंवा तदनुकूल बदल करून घेतलेल्या कोणत्याही वर्णनाच्या वस्तू असा आहे आणि त्यात, दारूगोळा, धारदार व अन्य प्राणघातक आयुधे व शस्त्राचे भाग आणि ती शस्त्रे तयार करण्याची यंत्रसामग्री यांचा समावेश होतो, पण लाठी किंवा चालताना वापरावयाची साधी काठी यांसारख्या, केवळ घरगुती किंवा शेतकी कामासाठी बनवलेल्या वस्तू, आणि ज्यांचा खेळणी म्हणून होणारा उपयोग सोडून अन्यथा उपयोग होऊ शकत नाही किंवा वापरयोग्य आयुधे म्हणून ज्यांचे रूपांतर होऊ शकत नाही अशी आयुधे यांचा समावेश नाही;

[4][(घ) "जिल्हा दंडाधिकारी" याचा, ज्या कोणत्याही क्षेत्रासाठी पोलीस आयुक्ताची नियुक्ती करण्यात आलेली आहे अशा क्षेत्राच्या संबंधातील अर्थ, पोलीस आयुक्त असा आहे. अशा संपूर्ण क्षेत्रावर किंवा त्याच्या कोणत्याही भागावर अधिकारिता वापरणारा जो कोणताही पोलीस उप आयुक्त राज्य शासनाकडून या बाबतीत अशा क्षेत्राच्या किंवा त्याच्या भागाच्या संबंधात विनिर्दिष्ट केला जाईल त्याचा त्यात समावेश होतो;]

---

१. हा अधिनियम १९६२ चा विनियम १२, कलम ३ व अनुसूची यांद्वारे गोवा, दमण व दीव यांवर, १९६३ चा विनियम ६, कलम २ व अनुसूची १ याद्वारे दादरा व नगरहवेली यांवर (१ जुलै, १९६५ रोजी व तेव्हापासून), १९६३ चा विनियम ७, कलम ३ व अनुसूची एक यांद्वारे पाँडेचेरीवर (१ ऑक्टोबर, १९६३ रोजी व तेव्हापासून) आणि अधिसूचना क्रमांक जी.एस.आर. ४६१ (ई), दिनांक २१ जुलै, १९७६ याद्वारे सिक्कीमवर विस्तारित करण्यात आला आहे.

२. १ ऑक्टोबर, १९६२—शासकीय अधिसूचना क्रमांक जी.एस.आर. ९९२, दिनांक १३ जुलै, १९६२ गॅझेट ऑफ इंडिया, १९६२—भाग दोन, उपविभाग ३ (एक), पृष्ठ १०९२ पहा.

३. १९८८ चा अधि. क्र. ४२ च्या कलम २ (एक) द्वारे गाळला. (१ सप्टेंबर १९८८ रोजी व तेव्हापासून).

४. १९७१ चा अधिनियम ५५, कलम २ द्वारे खंड (घ) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला (१३ डिसेंबर, १९७१ रोजी व तेव्हापासून).

(ङ) "अग्निशस्त्रे" याचा अर्थ, कोणतेही स्फोटक द्रव्य किंवा अन्य रूपातील ऊर्जा यांद्वारे कोणत्याही प्रकारचे क्षेप्यक किंवा क्षेप्यके सोडण्यासाठी बनवलेली किंवा तदनुकूल बदल करून घेतलेली कोणत्याही वर्णनाची शस्त्रे असा आहे, आणि त्यात पुढील गोष्टींचा समावेश होतो :—

(एक) तोफा, हातगोळे, दंगल-पिस्तुले किंवा कोणताही अपायकारक द्रव, वायू किंवा अशी अन्य वस्तू सोडण्यासाठी बनवलेली किंवा तदनुकूल बदल करून घेतलेली कोणत्याही प्रकारची आयुधे,

(दोन) अग्निशस्त्रांची रंजक उडवल्यामुळे होणारा आवाज किंवा चकमकाट कमी करण्यासाठी बनवलेली किंवा तदनुकूल बदल करून घेतलेली अशा कोणत्याही अग्निशस्त्रांची उपसाधने,

(तीन) अग्निशस्त्रांचे भाग व ती निर्माण करण्यासाठी लागणारी यंत्रसामग्री, आणि

(चार) तोफा चढवणे, वाहून नेणे व त्या डागणे यांसाठी लागणाऱ्या गाड्या, मचाणी व उपयंत्रे;

(च) "लायसन प्राधिकरण" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांखाली लायसने देण्याची किंवा त्यांचे नवीकरण करण्याची शक्ती प्रदान केलेला अधिकारी किंवा प्राधिकरण असा आहे, आणि त्यात शासनाचा समावेश होतो;

[1][(चच) "दंडाधिकारी" याचा अर्थ, 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) याखालील कार्यकारी दंडाधिकारी असा आहे; ]

(छ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे;

(ज) "मनाई केलेला दारूगोळा" याचा अर्थ, कोणताही अपायकारक द्रव, वायू किंवा अशी अन्य वस्तू ज्यामध्ये आहे, किंवा आत राहू शकेल अशा रीतीने बनवलेला किंवा तदनुकूल बदल करून घेतलेला असा कोणताही दारूगोळा असा आहे, आणि त्यात अग्निबाण, बाँब, स्फोटक गोळे, कुलपी गोळे, [2][क्षेपणास्त्र] टॉर्पेडो वापरणे व पाण्याखाली सुरुंग पेरणे यांसाठी बनवलेल्या वस्तू व केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे मनाई केलेला दारूगोळा म्हणून विनिर्दिष्ट करील अशा अन्य वस्तू यांचा समावेश होतो;

(झ) "मनाई केलेली शस्त्रे" याचा अर्थ,—

(एक) जी अग्निशस्त्रे घोड्यावर दाब दिला असता, घोड्यावरून दाब काढून घेण्यात येईपर्यंत किंवा क्षेपणास्त्रे ठेवलेला कोठा रिकामा होईपर्यंत त्यातून क्षेपणास्त्रे सुटत राहतील अशा रीतीने बनवलेली किंवा तदनुकूल बदल करून घेतलेली असतात ती अग्निशस्त्रे, किंवा

(दोन) कोणताही अपायकारक द्रव, वायू किंवा अशी अन्य वस्तू सोडण्यासाठी बनवलेली किंवा तदनुकूल बदल करून घेतलेली कोणत्याही वर्णनाची आयुधे,

असा आहे, आणि त्यामध्ये तोफा, विमानवेधी व रणगाडावेधी अग्निशस्त्रे आणि केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे मनाई केलेली शस्त्रे म्हणून विनिर्दिष्ट करील अशी इतर शस्त्रे यांचा समावेश आहे;

(ञ) "लोकसेवक" याला, 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या कलम २१ मध्ये असलेलाच अर्थ आहे;

(ट) "हस्तांतरण" याचे व्याकरणिक रूपभेद व सजातीय शब्दप्रयोग धरून त्यामध्ये भाड्याने देणे, उसनवार देणे व कब्जा देऊन टाकणे याचा समावेश आहे.

(२) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, अग्निशस्त्राच्या नळीची लांबी तोंडापासून, रंजक झाडण्यात आल्यावर ज्या ठिकाणी बाराचा स्फोट होतो तेथपर्यंत मोजण्यात येईल.

(३) एखाद्या क्षेत्रात अंमलात नसलेल्या कोणत्याही कायद्याच्या या अधिनियमात केलेल्या कोणत्याही उल्लेखाचा त्या क्षेत्राच्या संबंधातील अर्थ, त्या क्षेत्रात कोणताही समनुरूप कायदा अंमलात असल्यास त्या कायद्याचा उल्लेख म्हणून लावला जाईल.

(४) कोणताही अधिकारी किंवा प्राधिकारी यांचा या अधिनियमात कोणताही उल्लेख येईल तेव्हा, जेथे त्याच पदनामाचा कोणताही अधिकारी किंवा प्राधिकारी नसेल अशा एखाद्या क्षेत्राच्या संबंधात त्याचा अर्थ, केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अधिकाऱ्याचा किंवा प्राधिकाऱ्याचा उल्लेख म्हणून लावला जाईल.

---

१. १९८३ चा अधिनियम क्र. २५, कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आले (२२ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

२. १९८८ चा अधिनियम क्र. ४२, कलम २ (दोन) द्वारे "क्षेपणास्त्रे" हा शब्द घालण्यात आला (१ सप्टेंबर १९८८ रोजी व तेव्हापासून).

## प्रकरण २ रे

### शस्त्रे व दारूगोळा यांचे संपादन, कब्जा, निर्मिती, विक्री, आयात, निर्यात व वाहतूक

**३.** [1][(१)] कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाचे उपबंध व त्याखाली केलेले नियम यांच्या अनुसार याबाबतीत दिलेले लायसन तिने धारण केले नसेल तर, कोणतेही अग्निशस्त्र किंवा दारूगोळा संपादन करणार नाही, स्वतःच्या कब्जात ठेवणार नाही किंवा बरोबर बाळगणार नाही : **अग्निशस्त्रे व दारूगोळा संपादन करण्यासाठी व कब्जात ठेवण्यासाठी लायसन.**

परंतु, स्वतः लायसन धारण करत नसताना, एखाद्या व्यक्तीला लायसनधारकाच्या समक्ष किंवा त्याच्या लेखी प्राधिकारान्वये कोणतेही अग्निशस्त्र किंवा दारूगोळा दुरुस्तीकरिता किंवा लायसनच्या नवीकरणाकरिता किंवा अशा धारकाच्या उपयोगाकरिता बरोबर बाळगता येईल.

[2][(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पोटकलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यक्तीखेरीज इतर कोणत्याही व्यक्तीला, कोणत्याही वेळी, तीनपेक्षा अधिक अग्निशस्त्रे संपादन करता येणार नाहीत, स्वतःच्या कब्जात ठेवता येणार नाहीत किंवा बरोबर बाळगता येणार नाहीत :

परंतु, 'शस्त्र (विशोधन) अधिनियम, १९८३' (१९८३ चा २५) याच्या प्रारंभी ज्या व्यक्तीच्या कब्जात तीनपेक्षा जास्त अग्निशस्त्रे असतील अशा कोणत्याही व्यक्तीला, अशा अग्निशस्त्रांपैकी कोणतीही तीन अग्निशस्त्रे स्वतःजवळ ठेवून घेता येतील आणि अशा प्रारंभापासून नव्वद दिवसांच्या आत त्या व्यक्तीला उर्वरित अग्निशस्त्रे सर्वात जवळच्या पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याकडे किंवा कलम २१ च्या पोटकलम (१) च्या प्रयोजनार्थ विहित करण्यात आल्या असतील अशा शर्तींच्या अधीनतेने, लायसनधारक व्यापाऱ्याकडे किंवा अशी व्यक्ती ही संघराज्याच्या सशस्त्र सेनादलाची सदस्य असेल अशा बाबतीत, पथक शस्त्रागारामध्ये ती निक्षिप्त करावी लागतील.

(३) पोटकलम (२) मध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, अग्निशस्त्रांच्या कोणत्याही व्यापाऱ्याला किंवा केंद्र शासनाने लायसन दिलेल्या किंवा मान्यता दिलेल्या रायफल क्लबचा किंवा रायफल संघाचा जो कोणताही सदस्य नेमबाजीच्या सरावासाठी पॉईंट २२ बोअर रायफल किंवा हवाई रायफल वापरत असेल त्याला लागू होणार नाही.

(४) कलम २१ ची पोटकलमे (२) ते (६) (दोन्ही धरून) यांचे उपबंध, हे त्या कलमाच्या पोटकलम (१) खाली निक्षिप्त केलेल्या कोणत्याही शस्त्राला किंवा दारूगोळ्याला जसे लागू होतात तसेच ते, पोटकलम (२) च्या परंतुकाखाली निक्षिप्त केलेल्या कोणत्याही अग्निशस्त्रांच्या संबंधात लागू होतील.]

**४.** एखाद्या क्षेत्रातील प्रचलित परिस्थिती लक्षात घेता, अग्निशस्त्रांव्यतिरिक्त अन्य शस्त्रे संपादन करणे, ती कब्जात ठेवणे किंवा बरोबर बाळगणे याही गोष्टींचे विनियमन करणे लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक किंवा समयोचित आहे असे जर केंद्र शासनाचे मत असेल तर, ते शासकीय राजपत्रातील अधिसूचनेत विनिर्दिष्ट केले जाईल, त्या क्षेत्रास हे कलम लागू होईल असा निदेश देऊ शकेल, आणि त्यानंतर कोणतीही व्यक्ती या अधिनियमाचे उपबंध व त्याखाली केलेले नियम यांच्यानुसार या संबंधात दिलेले लायसन तिने धारण केले नसेल तर त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वर्गाची किंवा वर्णनाची शस्त्रे त्या क्षेत्रामध्ये संपादन करणार नाही, ती कब्जात ठेवणार नाही किंवा बरोबर बाळगणार नाही. **विवक्षित प्रकरणी विनिर्दिष्ट वर्णनाची शस्त्रे संपादन करण्यासाठी व कब्जात ठेवण्यासाठी लायसन.**

**५.** [3][(१)] कोणत्याही व्यक्तीला या अधिनियमाचे उपबंध व त्याखाली केलेले नियम यांनुसार देण्यात आलेले लायसन धारण केल्याशिवाय कोणतेही अग्निशस्त्र किंवा विहित असेल अशा वर्गापैकी किंवा वर्णनाची कोणतीही अग्निशस्त्रे किंवा कोणताही दारूगोळा— **शस्त्रे व दारूगोळा यांची निर्मिती, विक्री इत्यादींसाठी लायसन.**

(क) [4][यांचा वापर, निर्मिती], विक्री, हस्तांतरण, रूपांतरण, दुरुस्ती किंवा चाचणी करता येणार नाही किंवा वापरून दाखवता येणार नाही; अथवा

(ख) विक्रीकरिता मांडता येणार नाही किंवा विकत देऊ करता येणार नाही किंवा हस्तांतरित करता येणार नाही किंवा त्याची विक्री, हस्तांतरण, रूपांतरण, दुरुस्ती, चाचणी करण्यासाठी किंवा वापरून दाखवण्यासाठी स्वतःच्या कब्जांत ठेवता येणार नाही :

[5] * * * * *

---

१. १९८३ चा अधिनियम क्र. २५, कलम ३ द्वारे कलम ३ ला त्याचे पोटकलम (१) असा नवीन क्रमांक दिला (२२ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे ही कलमे समाविष्ट करण्यात आली (२२ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे नवीन क्रमांक देण्यात आला (२२ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

४. १९८८ चा अधिनियम क्र. ४२, कलम ३ द्वारे यांची निर्मिती या ऐवजी घातले (१ सप्टेंबर, १९८८ रोजी व तेव्हापासून).

५. १९८३ चा अधिनियम क्र. २५, कलम ४ द्वारे परंतुक गाळले (२२ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

[1][(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, याबाबतचे लायसन धारण न करता एखादी व्यक्ती आपल्या खाजगी वापराकरिता कायदेशीरपणे स्वत:च्या कब्जात ठेवलेली कोणतीही शस्त्रे किंवा दारूगोळा, या अधिनियमाच्या किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या आधारे जी व्यक्ती अशी शस्त्रे किंवा दारूगोळा स्वत:च्या कब्जात ठेवण्यास हक्कदार असेल अथवा व्यक्तीला ती कब्जात असण्यास या अधिनियमाद्वारे किंवा अशा अन्य कायद्याद्वारे मनाई नसेल अशा अन्य व्यक्तीस विकू शकेल किंवा तिच्याकडे हस्तांतरित करू शकेल :

परंतु, कलम ३ अन्वये ज्यांच्यासंबंधात लायसनाची आवश्यकता आहे अशी कोणतीही अग्निशस्त्रे किंवा दारूगोळा आणि कलम ४ अन्वये ज्यांच्यासंबंधात लायसनाची आवश्यकता आहे अशी कोणतीही शस्त्रे कोणतीही व्यक्ती,—

(क) अधिकारिता असलेल्या जिल्हा दंडाधिकाऱ्यास, किंवा सर्वांत जवळच्या पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्यास, अशी अग्निशस्त्रे, दारूगोळा किंवा इतर शस्त्रे विकण्याचा किंवा त्यांचे हस्तांतरण करण्याचा आपला उद्देश आणि अशी अग्निशस्त्रे, दारूगोळा किंवा इतर शस्त्रे तो ज्या व्यक्तीला विकू किंवा हस्तांतरित करू इच्छितो अशा व्यक्तीचे नाव व पत्ता कळविल्याशिवाय, आणि

(ख) अशी माहिती कळविण्यात आल्यानंतर किमान पंचेचाळीस दिवसांचा कालावधी संपल्या-शिवाय,

विकू शकणार नाही.]

**बंदुका आखूड करण्यासाठी किंवा नकली अग्निशस्त्रांचे खऱ्याखुऱ्या अग्निशस्त्रांमध्ये रूपांतर करण्यासाठी लायसन.**

६. कोणत्याही व्यक्तीला या अधिनियमाच्या किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या उप-बंधांनुसार दिलेले लायसन तिने धारण केल्याशिवाय अग्निशस्त्राची नळी आखूड करता येणार नाही किंवा नकली अग्निशस्त्रांचे खऱ्याखुऱ्या अग्निशस्त्रांमध्ये रूपांतर करता येणार नाही.

स्पष्टीकरण.—या कलमातील "नकली अग्निशस्त्रे" या शब्दप्रयोगाचा अर्थ, अग्निशस्त्रे असल्या-सारखी दिसणारी कोणतीही वस्तू असा आहे—मग त्यातून कोणतीही छर्रा, गोळी किंवा अन्य अस्त्र सोडता येणे शक्य असो वा नसो.

**मनाई केलेली शस्त्रे किंवा दारूगोळा यांचे संपादन किंवा कब्जा अथवा निर्मिती किंवा विक्री यांस मनाई.**

७. कोणत्याही व्यक्तीला, कोणतीही मनाई केलेली शस्त्रे किंवा मनाई केलेला दारूगोळा,—

(क) संपादन करणे, तो आपल्या कब्जात ठेवणे किंवा बरोबर बाळगणे; किंवा

(ख) [2][यांचा वापर, निर्मिती] करणे, विक्री करणे, हस्तांतरण करणे, रूपांतर करणे, दुरुस्ती करणे, चाचणी करणे किंवा तो वापरून दाखवणे; किंवा

(ग) विक्रीसाठी मांडणे किंवा विकत देऊ करणे किंवा त्यांची विक्री, हस्तांतरण, रूपांतर, दुरुस्ती, चाचणी करणे किंवा वापरून दाखवणे यासाठी तो आपल्या कब्जात ठेवणे यासंबंधात,

केंद्र शासनाने तिला विशेषेकरून प्राधिकृत केल्याशिवाय तसे करता येणार नाही.

**ओळखचिन्हे अंकित नसलेल्या अग्निशस्त्रांची विक्री किंवा हस्तांतरण करण्यास मनाई.**

८. (१) कोणत्याही व्यक्तीने अग्निशस्त्रांवर ठसवलेले किंवा अन्यथा दर्शवलेले कोणतेही नाव किंवा क्रमांक किंवा अन्य ओळखचिन्ह पुसून टाकता कामा नये, काढून टाकता कामा नये, त्यात फेरबदल करता कामा नये किंवा त्याचे बनावटीकरण करता कामा नये.

(२) कोणत्याही व्यक्तीने ज्यावर बनवणाऱ्याचे नाव, निर्माणकाचा क्रमांक किंवा अन्य ओळखचिन्ह ठसवलेले किंवा केंद्र शासनाने मान्य केलेल्या रीतीने अन्यथा दर्शविण्यात आलेले नसेल असे कोणतेही अग्निशस्त्र विकता कामा नये किंवा हस्तांतरित करता कामा नये.

(३) जेव्हा जेव्हा कोणत्याही व्यक्तीच्या कब्जात असे नाव, किंवा अन्य ओळखचिन्ह नसलेले किंवा ज्यावरून असे नाव, क्रमांक किंवा अन्य ओळखचिन्ह पुसून टाकण्यात, काढून टाकण्यात आलेले आहे, त्यात फेरबदल करण्यात किंवा त्याचे बनावटीकरण करण्यात आलेले आहे अशी कोणतीही अग्निशस्त्रे असतील तेव्हा तेव्हा, विरुद्ध शाबीत न झाल्यास, ते नाव, क्रमांक किंवा अन्य ओळखचिन्ह अशा व्यक्तीने पुसून टाकले, काढून टाकले, त्यात फेरबदल केला किंवा त्याचे बनावटीकरण केले असे गृहीत धरण्यात येईल :

परंतु, ज्यावर असे नाव, क्रमांक किंवा अन्य ओळखचिन्ह ठसवलेले किंवा अन्यथा दर्शविण्यात आलेले नाही असे कोणतेही अग्निशस्त्र या अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळी ज्याच्या कब्जात असेल अशा व्यक्तीच्या संबंधात, या पोटकलमाचे उपबंध, अशा प्रारंभापासून एक वर्ष संपेपर्यंत परिणामक होणार नाहीत.

---

१. १९८३ चा अधिनियम क्र. २५, कलम ४ द्वारे हे पोटकलम समाविष्ट केले (२२ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

२. १९८८ चा अधिनियम क्र. ४२, कलम ४ द्वारे यांची निर्मिती या ऐवजी घातले (१ सप्टेंबर, १९८८ रोजी व तेव्हापासून).

९. (१) या अधिनियमाच्या पूर्ववर्ती उपबंधांमध्ये काहीही असले तरी,—

**अल्पवयीन व्यक्ती व अन्य विवक्षित व्यक्ती यांनी अग्निशस्त्रे इत्यादी संपादन करण्यास किंवा कब्जात ठेवण्यास किंवा त्यांना ती विकण्यास किंवा त्यांच्याकडे ती हस्तांतरित करण्यास मनाई.**

(क) (एक) ज्या कोणत्याही व्यक्तीच्या वयास [1][एकवीस वर्षे] पूर्ण झालेली नाहीत तिला; किंवा

(दोन) हिंसाचार किंवा नैतिक अध:पात अनुस्यूत असणाऱ्या कोणत्याही अपराधाबद्दल दोषसिद्धी होऊन जिला [2][कोणत्याही मुदतीची] कारावासाची शिक्षा देण्यात आली असेल त्या व्यक्तीला अशा शिक्षेची मुदत संपल्यानंतरच्या पाच वर्षांच्या कालावधीपर्यंत कोणत्याही वेळी ; किंवा

(तीन) [3]['फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३'] (१९७४ चा २) याच्या ८ व्या प्रकरणाखाली ज्या व्यक्तीला शांतता राखण्यासाठी किंवा चांगल्या वर्तणुकीसाठी एखादे बंधपत्र निष्पादित करण्याचा आदेश देण्यात आला असेल त्या व्यक्तीला त्या बंधपत्राच्या मुदतीतील कोणत्याही वेळी कोणतेही अग्निशस्त्र किंवा दारूगोळा संपादन करता येणार नाही, आपल्या कब्जात ठेवता येणार नाही किंवा बरोबर बाळगता येणार नाही ;

(ख) कोणतीही व्यक्ती,—

(एक) ज्या व्यक्तीला कोणतेही अग्निशस्त्र किंवा दारूगोळा संपादन करण्यास, कब्जात ठेवण्यास किंवा बरोबर बाळगण्यास खंड (क) खाली मनाई करण्यात आली आहे, किंवा

(दोन) अशी विक्री, किंवा हस्तांतरण, किंवा असे रूपांतरण, दुरुस्ती, चाचणी झाली किंवा त्याचा वापर करून दाखवण्यात आला त्यावेळी ती विकल मनाची होती—

हे स्वत:ला माहीत आहे किंवा तसे समजण्यास कारण आहे अशा अन्य कोणत्याही व्यक्तीस कोणतेही अग्निशस्त्र किंवा दारूगोळा विकणार नाही किंवा हस्तांतरित करणार नाही किंवा तिच्या करिता कोणतेही अग्निशस्त्र किंवा दारूगोळा रूपांतरित करू शकणार नाही, दुरुस्त करू शकणार नाही त्याची चाचणी करू शकणार नाही, किंवा ते वापरून दाखवू शकणार नाही.

(२) पोटकलम (१), खंड (क), उपखंड (१) मध्ये काहीही असले तरी, ज्या व्यक्तीने विहित वयोमर्यादा गाठली आहे अशा व्यक्तीस अग्निशस्त्राच्या वापराचे प्रशिक्षण चालू असताना विहित करण्यात येतील अशी अग्निशस्त्रे विहित शर्तीवर वापरता येतील :

परंतु, वेगवेगळ्या प्रकारच्या अग्निशस्त्रांच्या बाबतीत वेगवेगळ्या वयोमर्यादा विहित करता येतील.

**शस्त्रे, इत्यादी आयात व निर्यात करण्यासाठी लायसन.**

१०. (१) कोणत्याही व्यक्तीला या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या उपबंधांनुसार यासंबंधातील लायसन धारण केल्याशिवाय समुद्रमार्गे, भूमार्ग किंवा हवाईमार्गे कोणतीही शस्त्रे किंवा दारूगोळा भारतामध्ये आणता येणार नाही किंवा तेथून बाहेर नेता येणार नाही :

परंतु,—

(क) कोणतीही शस्त्रे किंवा दारूगोळा आपल्या कब्जात ठेवण्यास या अधिनियमाच्या किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या आधारे हक्कदार असलेल्या किंवा तसे करण्यास या अधिनियमाद्वारे किंवा अशा कायद्याद्वारे जिला मनाई करण्यात आलेली नसेल अशा व्यक्तीस, या बाबतीतील लायसन असल्याशिवाय अशी शस्त्रे किंवा दारूगोळा स्वत:च्या खाजगी वापराकरिता वाजवी परिमाणात भारतात आणता येईल किंवा भारताबाहेर नेता येईल;

(ख) केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा कोणत्याही देशाचा खराखुरा पर्यटक असून ज्या व्यक्तीला कोणतीही शस्त्रे किंवा दारूगोळा आपल्या कब्जात ठेवण्यास त्या देशाच्या कायद्याद्वारे मनाई करण्यात आली नसेल त्या व्यक्तीला या कलमाखालील लायसनाशिवाय, पण विहित करण्यात येतील अशा शर्तीनुसार, केवळ खेळांच्या प्रयोजनांसाठी—अन्य प्रयोजनांसाठी नव्हे—वाजवी परिमाणात शस्त्रे व दारूगोळा आपल्याबरोबर भारतात आणता येईल.

स्पष्टीकरण.—या परंतुकाच्या खंड (ख) च्या प्रयोजनार्थ, "पर्यटक" या शब्दाचा अर्थ, भारताचा नागरिक नसलेली जी व्यक्ती मनोरंजन, स्थळदर्शन किंवा केंद्र शासनाने आमंत्रित केलेल्या बैठकींमध्ये किंवा आंतरराष्ट्रीय परिषदा, संघ किंवा इतर निकाय यांमध्ये प्रतिनिधी या नात्याने भाग घेणे याव्यतिरिक्त अन्य कोणताही उद्देश नसताना, सहा महिन्यांहून अधिक नाही इतक्या कालावधीकरिता भारतास भेट देते ती व्यक्ती असा आहे.

---

१. १९८३ चा अधिनियम क्र. २५, कलम ५ द्वारे "सोळा वर्षे" याऐवजी दाखल करण्यात आले (२२ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे "सहा महिन्यांहून कमी नाही इतक्या मुदतीची" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२२ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे "फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२२ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

(२) पोटकलम (१) च्या परंतुकामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आपणास त्या परंतुकाचा खंड (क) किंवा (ख) लागू होतो असा दावा सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस असा खंड लागू होतो किंवा कसे याबाबत अथवा अशा खंडात उल्लेखिलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या कब्जातील शस्त्रे किंवा दारूगोळा यांचे परिमाण वाजवी आहे किंवा कसे याबाबत अथवा अशी व्यक्ती अशी शस्त्रे व दारूगोळा यांचा ज्यासाठी उपयोग करते त्या उपयोगाबाबत सीमाशुल्क समाहारकास किंवा केंद्र शासनाने अधिकार प्रदान केलेल्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्यास कसलीही शंका असेल तर, त्याला अशा व्यक्तीच्या कब्जातील शस्त्रे किंवा दारूगोळा त्यासंबंधात त्यास केंद्र शासनाकडून आदेश मिळेपर्यंत अडकवून ठेवता येईल.

(३) भारताच्या एका भागाकडून समुद्रमार्गे किंवा हवाईमार्गे किंवा भारताचा भाग नसलेल्या कोणत्याही मध्यगत क्षेत्रातून दुसऱ्या भागाकडे नेलेली शस्त्रे व दारूगोळा, या अधिनियमाच्या अर्थानुसार भारताबाहेर नेली व भारतात आणली असे होते.

**शस्त्रे इत्यादींच्या आयातीस किंवा निर्यातीस मनाई करण्याची शक्ती.**

११. केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा वर्गांची व अशा वर्णनांची शस्त्रे किंवा दारूगोळा भारतात आणण्यास किंवा भारताबाहेर नेण्यास मनाई करू शकेल.

**शस्त्रांच्या वाहतुकीवर निर्बंध घालण्याची किंवा त्यास मनाई करण्याची शक्ती.**

१२. (१) केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे,—

(क) अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वर्गांची व अशा वर्णनांची शस्त्रे किंवा दारूगोळा यांची भारतामध्ये किंवा त्याच्या कोणत्याही भागामध्ये वाहतूक करण्यासंबंधात, या अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या उपबंधांनुसार देण्यात आलेले लायसन धारण केल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीने तसे करता कामा नये असा निदेश देऊ शकेल; किंवा

(ख) अशा वाहतुकीस संपूर्णपणे मनाई करू शकेल.

(२) एखाद्या सागरी बंदराच्या किंवा हवाई बंदराच्या ठिकाणी शस्त्रे व दारूगोळा बाहनांतरित केली असता त्यांची या कलमाच्या अर्थानुसार वाहतूक केली असे होते.

## प्रकरण ३ रे

### लायसनांसंबंधीचे उपबंध

**लायसने मंजूर करणे.**

१३. (१) दुसऱ्या प्रकरणाखाली लायसन मंजूर होण्यासाठी करावयाचा अर्ज लायसन प्राधिकरणाकडे करावा लागेल आणि तो विहित करण्यात येईल अशा नमुन्यात असेल व त्यात तसा विहित तपशील असेल व कोणतीही फी विहित करण्यात आलेली असेल तर ती त्यासोबत भरावी लागेल.

[1][ (२) अर्ज मिळाल्यावर, लायसन प्राधिकरण, सर्वात जवळच्या पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याचा त्या अर्जावरील अभिप्राय मागवील; आणि असा अधिकारी विहित अवधीत आपला अभिप्राय पाठवील.

(२क) लायसन प्राधिकरण, त्याला कोणतीही चौकशी करणे आवश्यक वाटल्यास, अशी चौकशी केल्यानंतर, आणि पोटकलम (२) खालील अभिप्राय मिळाल्यानंतर, या प्रकरणाच्या इतर उपबंधांच्या अधीनतेने लेखी आदेशाद्वारे एकतर लायसन देईल किंवा ते देण्यास नकार देईल :

परंतु, सर्वात जवळच्या पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याने अर्जावरील आपला अभिप्राय विहित अवधीत न पाठवल्यास अशा बाबतीत, लायसन प्राधिकरण त्याला तसे योग्य वाटले तर, विहित अवधी समाप्त झाल्यानंतर त्या अभिप्रायाची आणखी वाट न पाहता असा आदेश काढू शकेल.]

(३) लायसन प्राधिकरण पुढीलप्रमाणे लायसन मंजूर करील :—

(क) कलम ३ खालील लायसन,—

(एक) संरक्षण किंवा खेळ याकरिता वापरावयाची २० इंचांपेक्षा कमी नाही इतक्या लांबीची नळी व बिनआटयाची पोकळी असलेल्या बंदुकीबाबत किंवा खरोखरी पीक संरक्षणासाठी वापरावयाच्या, तोंडाकडून ठासलेल्या बंदुकीबाबत, भारताच्या एखाद्या नागरिकाने मागितल्यास ते दिले जाईल:

परंतु, एखाद्या प्रकरणातील परिस्थिती लक्षात घेता, तोंडाकडून ठासावयाची बंदूक पीक संरक्षणासाठी पुरेशी नाही अशी लायसन प्राधिकरणाची खात्री झाली तर, लायसन प्राधिकरण अशा संरक्षणासाठी उपरोक्तप्रमाणे बिनआटयाची पोकळी असलेल्या अन्य कोणत्याही बंदुकीच्या संबंधात लायसन देऊ शकेल, किंवा

---

१. १९८३ चा अधिनियम क्र. २५, कलम ६ द्वारे पोटकलम (२) ऐवजी दाखल करण्यात आले (२२ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

(दोन) केंद्र शासनाने लायसन दिलेल्या किंवा मान्यता दिलेल्या रायफल क्लबच्या किंवा रायफल संघाच्या सदस्याने नेमबाजीच्या सरावासाठी वापरावयाच्या पॉईंट २२ बोअर रायफलीबाबत किंवा हवाई रायफलीबाबत मागितले गेल्यास ते दिले जाईल.

(ख) कलम ३ खालील लायसन अन्य कोणत्याही बाबतीत किंवा कलम ४, कलम ५, कलम ६, कलम १० किंवा कलम १२ खालील लायसन ज्या व्यक्तीने मागितले असेल तिला ते मिळण्यास सबळ कारण आहे याविषयी लायसन प्राधिकरणाची खात्री पटली तर, ते दिले जाईल.

लायसने नाकारणे.

१४. (१) कलम १३ मध्ये काहीही असले तरी, लायसन प्राधिकरण पुढील बाबतीत लायसने मंजूर करण्यास नकार देईल :—

(क) कलम ३, कलम ४ किंवा कलम ५ याखालील लायसन कोणतीही मनाई केलेली शस्त्रे किंवा मनाई केलेला दारूगोळा यांच्याबाबत मागितले गेले असेल तेव्हा ते लायसन;

(ख) दुसऱ्या प्रकरणाखालील अन्य कोणत्याही बाबतीतील लायसन,—

(एक) जी व्यक्ती,—

(१) कोणतीही शस्त्रे किंवा दारूगोळा संपादन करण्यास, ती आपल्या कब्जात ठेवण्यास किंवा बरोबर बाळगण्यास या अधिनियमाद्वारे किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याद्वारे मनाई केलेली आहे, किंवा

(२) विकल मनाची आहे, किंवा

(३) या अधिनियमाखाली लायसन मिळण्यास कोणत्याही कारणामुळे अयोग्य आहे;

असे समजण्यास लायसन प्राधिकरणाला कारण आहे अशा व्यक्तीने मागितले असेल तेव्हा ; किंवा

(दोन) सार्वजनिक शांतता राखण्याच्या किंवा सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने असे लायसन मंजूर करण्यास नकार देणे आवश्यक आहे असे लायसन प्राधिकरणाला वाटत असेल तेव्हा, ते लायसन.

(२) लायसन प्राधिकरण, एखाद्या व्यक्तीच्या मालकीची किंवा तिच्या कब्जात पुरेशी मालमत्ता नाही एवढ्याच केवळ कारणावरून अशा कोणत्याही व्यक्तीला एखादे लायसन मंजूर करावयाचे नाकारणार नाही.

(३) एखाद्या व्यक्तीस लायसन मंजूर करण्यास लायसन प्राधिकरण नकार देईल त्याबाबतीत, ते अशा नकाराची कारणे लेखी नमूद करील आणि त्या व्यक्तीला त्यांचे संक्षिप्त निवेदन पुरवणे लोकहिताचे ठरणार नाही असे ज्या बाबतीत त्याचे मत असेल अशी एखादी बाब सोडून एरव्ही तो मागणी झाल्यास तिला असे निवेदन पुरवील.

लायसनाचा कालावधी व नूतनीकरण.

१५. (१) कलम ३ खालील लायसन ते मंजूर करण्यात आल्याच्या दिनांकापासून तीन वर्षे इतका काळ,—तत्पूर्वी ते प्रत्याहृत करण्यात आले नाही तर—अंमलात असण्याचे चालू राहील :

परंतु, ज्या व्यक्तीने लायसन मागितले असेल अशा व्यक्तीची तशी इच्छा असेल किंवा लायसन प्राधिकरणास एखाद्या बाबतीत लायसन त्याहून अल्प मुदतीपुरते मंजूर करावे असे वाटत असेल तर, कारणे लेखी नमूद करून असे लायसन त्या अल्प मुदतीपुरते मंजूर करता येईल.

(२) दुसऱ्या प्रकरणाच्या अन्य कोणत्याही उपबंधाखालील लायसन ज्या दिनांकास ते मंजूर करण्यात आले त्या दिनांकापासून लायसन प्राधिकरण प्रत्येक बाबतीत ठरवील अशा कालावधीपुरते,—तत्पूर्वी ते प्रत्याहृत करण्यात आले नाही तर,—अंमलात असण्याचे चालू राहील.

(३) प्रत्येक लायसन मुळात ते जेवढ्या कालावधीकरता मंजूर करण्यात आले होते तेवढ्याच कालावधीपुरते नूतनीकरणयोग्य असेल आणि वेळोवेळी अशाप्रकारे त्याचे नूतनीकरण करता येईल आणि कलमे १३ व १४ यांचे उपबंध लायसनाच्या मंजुरीस ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे ते त्याच्या नूतनीकरणास लागू होतील, मात्र एखाद्या बाबतीत लायसन प्राधिकरणाने अन्यथा ठरवले तर त्याला कारणे नमूद करावी लागतील.

लायसनाची फी इत्यादी.

१६. किती फी दिल्यावर, कोणत्या शर्तींच्या अधीनतेने व कोणत्या नमुन्यात लायसन मंजूर करण्यात येईल किंवा त्याचे नूतनीकरण करण्यात येईल या गोष्टी विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असतील :

परंतु, निरनिराळ्या प्रकारच्या लायसनांकरिता निरनिराळ्या फी, निरनिराळ्या शर्ती व निरनिराळे नमुने विहित करता येतील :

परंतु आणखी असे की, लायसनात विहित असलेल्या शर्तींशिवाय आणखी, लायसन प्राधिकरणास कोणत्याही विवक्षित बाबतीत आवश्यक वाटतील अशा अन्य शर्तींचा समावेश असू शकेल.

लायसनांमध्ये बदल, त्यांचे निलंबन व प्रत्याहरण.

१७. (१) ज्यांच्या अधीनतेने लायसन मंजूर करण्यात आले असेल अशांपैकी विहित असतील अशा शर्तींखेरीज अन्य शर्ती लायसन प्राधिकरणास बदलता येतील आणि त्या प्रयोजनाकरिता ते लेखी नोटिशीद्वारे लायसनधारकास त्या नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत लायसन आपल्या स्वाधीन करण्याची आज्ञा करू शकेल.

(२) लायसनधारकाच्या अर्जावरून देखील लायसन प्राधिकरणास लायसनाच्या शर्तीपैकी विहित असतील अशा शर्तीखेरीज अन्य शर्तींमध्ये बदल करता येईल.

(३) (क) कोणतीही शस्त्रे किंवा दारूगोळा संपादन करण्यास, तो आपल्या कब्जात ठेवण्यास किंवा बरोबर बाळगण्यास लायसनधारकाला या अधिनियमाद्वारे किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या कायद्याद्वारे मनाई करण्यात आलेली आहे किंवा तो विकल मनाचा आहे, किंवा या अधिनियमाखाली लायसन धारण करण्यास कोणत्याही कारणांमुळे अपात्र आहे अशी लायसन प्राधिकरणाची खात्री झाली तर; किंवा

(ख) सार्वजनिक शांतता राखण्याच्या किंवा सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने लायसन निलंबित करणे किंवा प्रत्याहृत करणे आवश्यक आहे असे लायसन प्राधिकरणास वाटले तर; किंवा

(ग) लायसनासाठी अर्ज करण्याच्या वेळी लायसनधारकाने किंवा त्याच्या वतीने अन्य कोणत्याही व्यक्तीने महत्त्वाची माहिती दडपून टाकून किंवा त्यांनी पुरविलेल्या चुकीच्या माहितीच्या आधारे मिळवलेली असेल तर; किंवा

(घ) लायसनाच्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे व्यतिक्रमण करण्यात आले असेल तर; किंवा

(ङ) लायसन स्वाधीन करण्याबाबत लायसनधारकाला आज्ञापिणाऱ्या पोटकलम (१) खालील नोटिशीचे अनुपालन करण्यात त्याने कसूर केली असेल तर,

लायसन प्राधिकरणाला लेखी आदेशाद्वारे ते लायसन त्याला योग्य वाटेल अशा कालावधीपुरते निलंबित करता येईल किंवा ते प्रत्याहृत करता येईल.

(४) लायसन प्राधिकरणास लायसनधारकाच्या अर्जावरूनदेखील लायसन प्रत्याहृत करता येईल.

(५) जेव्हा लायसन प्राधिकरण पोटकलम (१) खाली लायसनामध्ये बदल करणारा किंवा पोटकलम (३) खाली लायसन निलंबित किंवा प्रत्याहृत करणारा आदेश देईल तेव्हा, ते त्याबद्दलचे कारण लेखी नमूद करील आणि लायसनधारकाला त्याचे संक्षिप्त निवेदन पुरवणे लोकहिताचे ठरणार नाही असे ज्या बाबतीत त्याचे मत असेल अशी एखादी बाब सोडून एरव्ही ते, मागणी झाल्यास त्याला असे निवेदन पुरवील.

(६) लायसन प्राधिकरण ज्यास दुय्यम असेल असे प्राधिकरण, लायसन प्राधिकरणास ज्या कारणावरून लायसन निलंबित किंवा प्रत्याहृत करता येईल अशा कोणत्याही कारणावरून लेखी आदेशाद्वारे लायसन निलंबित किंवा प्रत्याहृत करू शकेल; आणि या कलमाचे पूर्ववर्ती उपबंध, होईल तेथवर, अशा लायसन प्राधिकरणाकडून होणारे लायसनाचे निलंबन किंवा प्रत्याहरण यासंबंधात लागू होतील.

(७) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या अधीनतेने, कोणत्याही अपराधाबद्दल लायसनधारकास दोषी ठरवणारे कोणतेही न्यायालय, लायसन निलंबित किंवा प्रत्याहृतही करू शकेल :

परंतु, अपिलान्ती किंवा अन्यथा दोषसिद्धी रद्द ठरवण्यात आली तर, निलंबन किंवा प्रत्याहरण शून्य होईल.

(८) पोटकलम (७) खालील निलंबनाचा किंवा प्रत्याहरणाचा आदेश अपील न्यायालयास किंवा पुनरीक्षण करण्याच्या आपल्या शक्तींचा वापर करताना उच्च न्यायालयासही काढता येईल.

(९) केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील आदेशाद्वारे, या अधिनियमाखाली मंजूर करण्यात आलेली सर्व किंवा त्यांपैकी कोणतीही लायसने संपूर्ण भारतभर किंवा त्याच्या कोणत्याही भागापुरती निलंबित किंवा प्रत्याहृत करू शकेल किंवा निलंबित किंवा प्रत्याहृत करण्याविषयी लायसन प्राधिकरणास निदेश देऊ शकेल.

(१०) या कलमाखाली लायसनाचे निलंबन किंवा प्रत्याहरण झाल्यावर, त्याचा धारक विनाविलंब असे लायसन, ज्याने ते निलंबित किंवा प्रत्याहृत केले त्या प्राधिकरणाच्या किंवा निलंबनाच्या किंवा प्रत्याहरणाच्या आदेशात यासंबंधी विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अन्य प्राधिकरणाच्या स्वाधीन करील.

अपिले. १८. (१) लायसन प्राधिकरणाने दिलेला, लायसन मंजूर करण्याचे नाकारणारा किंवा लायसनाच्या शर्तींमध्ये बदल करणारा आदेश अथवा लायसन प्राधिकरणाने किंवा लायसन प्राधिकरण ज्यास दुय्यम आहे अशा प्राधिकरणाने दिलेला, लायसनाचे निलंबन किंवा प्रत्याहरण करणारा आदेश यामुळे नाराज झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, विहित करण्यात येईल अशा प्राधिकरणाकडे (ज्याचा यात यापुढे "अपील प्राधिकरण" म्हणून उल्लेख करण्यात आला आहे) व तशा विहित कालावधीत त्या आदेशाविरुद्ध अपील करता येईल :

परंतु, शासनाने किंवा त्याच्या निदेशाखाली दिलेल्या कोणत्याही आदेशाविरुद्ध कोणतेही अपील होऊ शकणार नाही.

(२) अपील दाखल करण्यासाठी विहित केलेला कालावधी संपल्यानंतर ते दाखल करण्यात आल्यास ते दाखल करून घेतले जाणार नाही :

परंतु, उक्त कालावधीत अपील दाखल न करण्याला आपणास पुरेसे कारण होते याविषयी अपील-कर्त्याने अपील प्राधिकरणाची खात्री करून दिली तर, विहित केलेला कालावधी संपल्यानंतरही अपील दाखल करून घेता येईल.

(३) अपिलाकरिता विहित केलेला कालावधी [१]''भारतीय मुदत अधिनियम, १९०८' (१९०८ चा ९) याखालील मुदतींची संगणना करण्याबाबत त्यामध्ये असलेल्या उपबंधानुसार संगणित केला जाईल.

(४) या कलमाखालील प्रत्येक अपील लेखी विनंती-अर्जाद्वारे करण्यात येईल आणि ज्याविरुद्ध अपील करण्यात आले आहे अशा आदेशामागील कारणांचे संक्षिप्त निवेदन अपीलकर्त्यास पुरवण्यात आले असल्यास, असे निवेदन आणि विहित करण्यात येईल अशी फी त्या अर्जासोबत असेल.

(५) अपिलाचा निकाल करताना, अपील प्राधिकरण विहित करण्यात येईल अशी प्रक्रिया अनुसरील :

परंतु, अपीलकर्त्यास आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय, कोणत्याही अपिलाचा निकाल करण्यात येणार नाही.

(६) ज्याविरुद्ध अपील करण्यात आले असेल असा आदेश, अपील प्राधिकरणाने अन्यथा सशर्त किंवा बिनशर्त निदेश दिला नसेल तर, अशा आदेशाविरुद्ध झालेल्या अपिलाचा निकाल होईपर्यंत अंमलात राहील.

(७) ज्याविरुद्ध अपील करण्यात आले असेल असा आदेश कायम करणारा, त्यात अपरिवर्तन करणारा किंवा तो फिरवणारा अपील प्राधिकरणाचा प्रत्येक आदेश अंतिम असेल.

## प्रकरण ४ थे

### शक्ती व प्रक्रिया

**१९.** (१) कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास किंवा केंद्र शासनाने या बाबतीत विशेषेकरून शक्ती प्रदान केलेल्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्यास, कोणतीही शस्त्रे किंवा दारूगोळा बरोबर बाळगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने आपले लायसन हजर करावे अशी मागणी करता येईल. लायसन, इत्यादी हजर करण्याची मागणी करण्याची शक्ती.

(२) जिच्याकडे मागणी करण्यात आली असेल अशा व्यक्तीने लायसन हजर करण्याचे किंवा अशी शस्त्रे किंवा दारूगोळा लायसनाशिवाय बरोबर बाळगण्यास या अधिनियमाच्या किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या आधारे आपण हक्कदार आहोत हे दाखवून देण्याचे नाकारले किंवा त्या कामी कसूर केली तर, संबंधित अधिकारी, त्यास आपले नाव व पत्ता देण्याची आज्ञा करू शकेल आणि जर अशा अधिकाऱ्यास आवश्यक वाटले तर, अशा व्यक्तीने बरोबर बाळगलेली शस्त्रे किंवा दारूगोळा तिच्याकडून सक्तीने ताब्यात घेऊ शकेल.

(३) जर त्या व्यक्तीने आपले नाव व पत्ता देण्यास नकार दिला अथवा ती व्यक्ती खोटे नाव किंवा खोटा पत्ता देत असावी किंवा फरारी होण्याचा तिचा उद्देश असावा असा संबंधित अधिकाऱ्यास संशय आला तर, असा अधिकारी तिला अधिपत्राविना अटक करू शकेल.

**२०.** जेव्हा एखादी व्यक्ती कोणतीही शस्त्रे किंवा दारूगोळा—मग तो लायसनाच्या कक्षेत असो वा नसो—अशा रीतीने किंवा अशा परिस्थितीत बरोबर बाळगून असल्याचे किंवा नेत असल्याचे आढळून येईल की, ज्येणेकरून ती शस्त्रे किंवा दारूगोळा कोणत्याही बेकायदेशीर प्रयोजनार्थ वापरण्याच्या उद्देशाने तिने बरोबर बाळगली असावीत किंवा त्यासाठी ती वापरली जातील अशा संशयास रास्त आधार मिळत असेल तेव्हा, कोणताही दंडाधिकारी, कोणताही पोलीस अधिकारी किंवा अन्य कोणताही लोकसेवक अथवा रेल्वे, वायुयान, जलयान, वाहन किंवा वाहतुकीचे अन्य कोणतेही साधन या ठिकाणी नेमलेली किंवा काम करणारी कोणतीही व्यक्ती, तिला अधिपत्रविना अटक करून तिच्याकडून अशी शस्त्रे किंवा दारूगोळा सक्तीने ताब्यात घेऊ शकेल. संशयास्पद परिस्थितीत शस्त्रे, इत्यादी नेणाऱ्या व्यक्तींना अटक करणे.

**२१.** (१) ज्यांचा कब्जा लायसनाचा कालावधी संपल्यामुळे किंवा लायसनाचे निलंबन किंवा प्रत्याहरण करण्यात आल्यामुळे किंवा कलम ४ खाली अधिसूचना काढण्यात आल्यामुळे किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे कायदेशीर असण्याचे बंद झाले असेल अशी कोणतीही शस्त्रे किंवा दारूगोळा ज्या व्यक्तीच्या कब्जात असेल अशी कोणतीही व्यक्ती, अनावश्यक विलंब न लावता सर्वांत जवळच्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याकडे किंवा विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने, लायसनधारक व्यापाऱ्याकडे किंवा जर अशी व्यक्ती संघराज्याच्या सशस्त्र सेनेची सदस्य असेल तर पथक शस्त्रागारामध्ये तो निक्षिप्त करील. कब्जा कायदेशीर असण्याचे बंद झाल्यावर शस्त्रे, इत्यादींचा निक्षेप.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमातील "पथक शस्त्रागार" या संज्ञेमध्ये भारतीय नौसेनेच्या जहाजामधील किंवा आस्थापनेमधील शस्त्रागार समाविष्ट आहे.

(२) शस्त्रे किंवा दारूगोळा पोटकलम (१) खाली निक्षिप्त करण्यात आला असेल त्या बाबतीत, निक्षेपक, किंवा त्याचा मृत्यू झाल्यास त्याचा वैध प्रतिनिधी, विहित करण्यात येईल असा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी,—

(क) या अधिनियमाच्या किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या आधारे तो अशाप्रकारे निक्षिप्त केलेली कोणतीही वस्तू आपल्या कब्जात घेण्यास हक्कदार झाल्यावर ती परत मिळण्यास, किंवा

---

१. आता पहा, 'मुदत अधिनियम, १९६३' (१९६३ चा ३६).

(ख) या अधिनियमाच्या किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या आधारे, जी व्यक्ती अशा प्रकारे निक्षिप्त केलेली कोणतीही वस्तू आपल्या कब्जात घेण्यास किंवा तिच्या विल्हेवाटीतून मिळणारे उत्पन्न मिळण्यास हक्कदार असेल किंवा ती कब्जात ठेवण्यास या अधिनियमाद्वारे किंवा अशा अन्य कायद्याद्वारे जिला मनाई करण्यात आलेली नाही अशा कोणत्याही व्यक्तीकडे विक्रीद्वारे किंवा अन्यथा हस्तांतरित करून तिची विल्हेवाट करण्यास किंवा विल्हेवाट प्राधिकृत करण्यास हक्कदार असेल :

परंतु, या पोटकलमातील कोणतीही गोष्ट, ज्याचे अधिहरण कलम ३२ खाली निदेशित करण्यात आले असेल अशी कोणतीही वस्तू परत करण्यास किंवा तिची विल्हेवाट करण्यास प्राधिकृत करते असे मानले जाणार नाही.

(३) निक्षिप्त करण्यात आलेल्या व पोटकलम (२) खाली, त्यामध्ये निर्देशिलेल्या कालावधीत परत न मिळालेल्या किंवा विल्हेवाट न करण्यात आलेल्या सर्व वस्तू जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या आदेशान्वये समपहृत होऊन शासनाकडे जमा होतील :

परंतु, एखाद्या लायसनाचे निलंबन झाले असल्यास लायसनाच्या कक्षेत येणाऱ्या वस्तुंच्या बाबतीत, निलंबन-कालावधीत असा कोणताही समपहरण आदेश देण्यात येणार नाही.

(४) पोटकलम (३) खाली आदेश काढण्यापूर्वी, विहित रीतीने निक्षेपकावर किंवा त्याचा मृत्यू झाला असल्यास त्याच्या वैध प्रतिनिधीवर लेखी नोटीस बजावून तीद्वारे जिल्हाधिकारी, नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या वस्तू का समपहृत करण्यात येऊ नयेत याचे कारण त्याने नोटीस बजावण्यात आल्यापासून तीस दिवसांच्या आत दाखवावे अशी आज्ञा करील.

(५) निक्षेपकाने किंवा, प्रकरणपरत्वे, त्याच्या वैध प्रतिनिधीने कोणतेही कारण दाखवले असल्यास ते विचारात घेऊन जिल्हा दंडाधिकारी, त्याला योग्य वाटेल असा आदेश देईल.

(६) समपहृत होऊन जमा झालेल्या वस्तू किंवा त्यांच्या विल्हेवाटीपासून झालेले उत्पन्न शासन संपूर्णतः किंवा अंशतः कोणत्याही वेळी निक्षेपकाला किंवा त्याच्या वैध प्रतिनिधीला परत करू शकेल

दंडाधिकाऱ्याने झडती घेणे व सक्तीने ताब्यात घेणे.

२२. (१) जेव्हा जेव्हा कोणत्याही दंडाधिकाऱ्यास,—

(क) त्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही बेकायदेशीर प्रयोजनासाठी कोणतीही शस्त्रे किंवा दारूगोळा आपल्या कब्जात बाळगलेला आहे, किंवा

(ख) अशा व्यक्तीच्या कब्जात कोणतीही शस्त्रे किंवा दारूगोळा राहू दिल्यास सार्वजनिक शांततेला किंवा सुरक्षिततेला धोका पोचल्याशिवाय राहणार नाही,

असे समजण्यास कारण असेल तेव्हा, आपल्या या समजामागील कारणे नमूद करून, दंडाधिकाऱ्याला अशा व्यक्तीच्या ताब्यात असलेल्या अथवा जेथे अशी शस्त्रे किंवा दारूगोळा सापडण्यासारखा आहे असे समजण्यास या दंडाधिकाऱ्याला कारण असेल त्या घराची किंवा वास्तुची झडती करवता येईल आणि अशी कोणतीही शस्त्रे किंवा दारूगोळा असल्यास, जरी हा अधिनियम किंवा त्या त्या काळी अंमलात असलेला अन्य कोणताही कायदा यांच्या आधारे ती व्यक्ती ती कब्जात ठेवण्यास हक्कदार असली तरी, ती सक्तीने ताब्यात घेऊन स्वतःला योग्य वाटेल इतक्या कालावधीकरता आपल्या ताब्यात सुरक्षितपणे अडकवून ठेवता येतील.

(२) या कलमाखालील प्रत्येक झडती, दंडाधिकाऱ्याकडून किंवा त्याच्या समक्ष किंवा केंद्र शासनाने या बाबतीत विशेषेकरून शक्ती प्रदान केलेल्या एखाद्या अधिकाऱ्याकडून किंवा त्याच्या समक्ष करण्यात येईल.

शस्त्रे, इत्यादींसाठी जलयाने, वाहने यांची झडती.

२३. कोणताही दंडाधिकारी, कोणताही पोलीस अधिकारी किंवा केंद्र शासनाने या बाबतीत विशेषेकरून शक्ती प्रदान केलेला अन्य कोणताही अधिकारी याला या अधिनियमाचे, किंवा त्याअन्वये केलेल्या नियमांचे कोणत्याही प्रकारे व्यतिक्रमण करण्यात येत आहे किंवा होण्याचा संभव आहे किंवा कसे याबाबत खातरजमा करून घेण्यासाठी, कोणतेही जलयान, वाहन किंवा वाहतुकीचे अन्य साधन थांबवता येईल व त्याची झडती घेता येईल आणि त्यात सापडतील अशी कोणतीही शस्त्रे किंवा दारूगोळा असे जलयान, वाहन किंवा वाहतुकीचे अन्य साधन यांसह सक्तीने ताब्यात घेता येईल.

केंद्र शासनाच्या आदेशान्वये सक्तीने ताब्यात घेणे किंवा अडकवून ठेवणे.

२४. एखादी व्यक्ती कोणतीही शस्त्रे किंवा दारूगोळा आपल्या कब्जात ठेवण्यास या अधिनियमाच्या किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या आधारे हक्कदार असली तरी, केंद्र शासन, कोणत्याही वेळी अशा व्यक्तीच्या कब्जातील कोणतीही शस्त्रे किंवा दारूगोळा सक्तीने ताब्यात घेण्याचा आदेश देऊ शकेल, आणि सार्वजनिक शांतता व सुरक्षितता यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशा कालावधीपर्यंत ती अडकवून ठेवू शकेल.

[1][ २४क. (१) एखाद्या क्षेत्रातील सार्वजनिक शांततेचा आणि प्रशांततेचा मोठ्या प्रमाणात भंग झाला आहे किंवा अशी शांतता भंग पावण्याचा धोका निकट येऊन ठेपला आहे याबाबत आणि अशा क्षेत्रात शस्त्रांच्या वापराचा अंतर्भाव असलेल्या अपराधांना प्रतिबंध करण्यासाठी तसे करणे आवश्यक किंवा समयोचित आहे याबाबत केंद्र शासनाची खात्री झाली असेल अशा बाबतीत, ते शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे :--

**शांतताभंग झालेली क्षेत्रे, इत्यादींमध्ये अधिसूचित शस्त्रे कब्जात बाळगण्यास मनाई.**

(क) अशा क्षेत्राच्या मर्यादा विनिर्दिष्ट करू शकेल;

(ख) अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेला कालावधी (असा कालावधी म्हणजे ती अधिसूचना **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या तारखेनंतरच्या चौथ्या दिवसाच्या आधीची नाही अशा तारखेपासून सुरू होणारा कालावधी असेल) सुरू होण्यापूर्वी, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात आले असेल अशा वर्णनाची कोणतीही शस्त्रे (याप्रमाणे विनिर्दिष्ट केलेल्या शस्त्रांना या कलमात यापुढे "अधिसूचित शस्त्रे" म्हणून निर्दिष्ट केले आहे) कब्जात बाळगणाऱ्या अशा क्षेत्रातील प्रत्येक व्यक्तीने अशी शस्त्रे, अशा प्रारंभापूर्वी कलम २१ च्या उपबंधानुसार निक्षिप्त केली पाहिजेत. आणि या अधिनियमाच्या इतर कोणत्याही उपबंधात (कलम ४१ वगळून) किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, अशा व्यक्तीकडे असलेला कोणत्याही अधिसूचित शस्त्रांचा कब्जा हा या प्रयोजनार्थ कायदेशीर राहिला नसल्याचे मानण्यात यावे असे निदेशित करू शकेल;

(ग) अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या प्रारंभापासून आणि तो समाप्त होईपर्यंत अशा कोणत्याही क्षेत्रातील कोणतीही अधिसूचित शस्त्रे कोणत्याही व्यक्तीने स्वतःच्या कब्जात ठेवणे हे कायदेशीर ठरणार नाही असे अधिसूचित करू शकेल.

(घ) अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या अखत्याराखालील कोणत्याही अधिकाऱ्याला,--

(एक) अशा क्षेत्रात असलेल्या किंवा त्यामधून जाणाऱ्या एखाद्या व्यक्तीकडे अथवा त्या क्षेत्रामधील कोणत्याही परिवास्तूत अथवा त्या क्षेत्रामध्ये असलेल्या किंवा त्यामधून जाणाऱ्या कोणत्याही प्राण्याजवळ किंवा जलयानात किंवा वाहनात किंवा कोणत्याही स्वरूपाच्या वाहतुकीच्या अन्य साधनात अथवा त्या क्षेत्रामध्ये असलेल्या कोणत्याही पात्रात किंवा कोणत्याही स्वरूपाच्या इतर कोणत्याही आधानकात कोणतीही अधिसूचित शस्त्रे लपवण्यात आलेली आहेत असे मानावयाला त्याला कारण असेल तर, अधिसूचनेत विनिर्दिष्ट केला असेल अशा कालावधीत कोणत्याही वेळी अशी व्यक्ती किंवा अशी परिवास्तू किंवा असा प्राणी किंवा असे जलयान, वाहन किंवा वाहतुकीचे अन्य साधन किंवा असे पात्र किंवा अन्य आधानक यांची झडती घेण्यासाठी;

(दोन) अशा क्षेत्रातील कोणत्याही व्यक्तीच्या कब्जात असलेली किंवा पोटकलम (एक) खालील झडतीत सापडलेली कोणतीही अधिसूचित शस्त्रे, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीत कोणत्याही वेळी हस्तगत करून अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीत ती अडकवून ठेवण्यासाठी;

प्राधिकृत करू शकेल.

(२) कोणत्याही क्षेत्राच्या संबंधात पोटकलम (१) खाली काढलेल्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करावयाचा कालावधी प्रथमतः नव्वद दिवसांपेक्षा जास्त असणार नाही, मात्र अशा क्षेत्रात पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे सार्वजनिक शांततेचा आणि प्रशांततेचा असा भंग किंवा त्याचा निकटवर्ती धोका चालू आहे आणि अशा क्षेत्रात शस्त्रांच्या वापराचा अंतर्भाव असलेल्या अपराधांना प्रतिबंध करण्यासाठी तसे आवश्यक किंवा समयोचित आहे असे केंद्र शासनाचे मत असेल तर, ते शासन असा कालावधी वेळोवेळी, कोणत्याही एका वेळी जास्तीत जास्त नव्वद दिवसांच्या कोणत्याही कालावधीने वाढविण्यासाठी अशी अधिसूचना विशोधित करू शकेल.

(३) 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) यामधील झडती आणि अभिग्रहण यांच्यासंबंधीचे उपबंध, पोटकलम (१) खाली केलेल्या कोणत्याही झडतीला किंवा अभिग्रहणाला शक्य तितपत लागू होतील.

(४) या कलमाच्या प्रयोजनासाठी,--

(क) "शस्त्रे" यामध्ये दारूगोळ्याचा समावेश होतो;

(ख) मूलतः पोटकलम (१) खाली काढलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेला कोणताही कालावधी पोटकलम (२) अन्वये वाढविण्यात आला असेल अशा बाबतीत, अशा अधिसूचनेच्या संबंधात पोटकलम (१) मधील, "अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेला कालावधी" हा निर्देश म्हणजे अशा प्रकारे वाढविण्यात आलेल्या कालावधीचा निर्देश होय असा त्याचा अर्थ लावण्यात येईल.

---

१. १९८३ चा अधिनियम क्र. २५, कलम ७ द्वारे ही कलमे समाविष्ट करण्यात आली (२२ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

**शांतताभंग झालेली क्षेत्रे, इत्यादीमधील सार्वजनिक ठिकाणे किंवा त्यामधून अधिसूचित शस्त्रे घेऊन जाण्यास मनाई.**

२४ ख. (१) कोणत्याही क्षेत्रातील सार्वजनिक शांततेचा आणि प्रशांततेचा भंग झाला आहे किंवा अशा शांततेला निकटवर्ती धोका निर्माण झाला आहे याबाबत आणि अशा क्षेत्रात शस्त्रांच्या वापराचा अंतर्भाव असलेल्या अपराधांना प्रतिबंध करण्यासाठी तसे आवश्यक किंवा समयोचित आहे याबाबत केंद्र शासनाची खात्री झाली असेल अशा बाबतीत, ते शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे—

(क) अशा क्षेत्राच्या मर्यादा विनिर्दिष्ट करू शकेल ;

(ख) अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत (असा कालावधी म्हणजे ती अधिसूचना शासकीय राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या तारखेनंतरच्या दुसऱ्या दिवसाच्या आधीची नाही अशा तारखेपासून सुरू होणारा कालावधी असेल), कोणत्याही व्यक्तीने, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात आले असेल अशा वर्णनाची कोणतीही शस्त्रे (अशा प्रकारे विनिर्दिष्ट केलेल्या शस्त्रांना या कलमात यापुढे 'अधिसूचित शस्त्रे' म्हणून निर्दिष्ट केले आहे) अशा क्षेत्रातील कोणत्याही सार्वजनिक ठिकाणामधून किंवा त्यामध्ये घेऊन जाता कामा नयेत किंवा अन्यथा कब्जात ठेवता कामा नयेत असे निदेशित करू शकेल ;

(ग) अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा, केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या अखत्याराखालील कोणत्याही अधिकाऱ्याला,—

(एक) अशा क्षेत्रातील कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी असलेल्या किंवा त्यामधून जाणाऱ्या एखाद्या व्यक्तीकडे अथवा त्या ठिकाणामधील किंवा त्याचा भाग असलेल्या कोणत्याही परिवास्तूत अथवा त्या ठिकाणामध्ये असलेल्या किंवा त्यामधून जाणाऱ्या कोणत्याही प्राण्याजवळ किंवा जलयानात किंवा वाहनात कोणत्याही स्वरूपाच्या वाहतुकीच्या अन्य साधनात अथवा त्या ठिकाणी असलेल्या कोणत्याही पात्रात किंवा कोणत्याही स्वरूपाच्या इतर कोणत्याही आधानकात कोणतीही अधिसूचित शस्त्रे लपवण्यात आलेली आहेत असे मानायला त्याला कारण असेल तर, अधिसूचनेत विनिर्दिष्ट केला असेल अशा कालावधीत कोणत्याही वेळी अशी व्यक्ती किंवा अशी परिवास्तू किंवा असा प्राणी किंवा असे जलयान, वाहन किंवा वाहतुकीचे अन्य साधन किंवा असे पात्र किंवा अन्य आधानक यांची झडती घेण्यासाठी;

(दोन) अशा क्षेत्रातील कोणत्याही सार्वजनिक ठिकाणामधून किंवा ठिकाणी कोणतीही व्यक्ती नेत असलेली किंवा अन्यथा तिच्या कब्जात असलेली अगर पोटकलम (एक) खाली झडतीत सापडलेली कोणतीही अधिसूचित शस्त्रे, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीत, कोणत्याही वेळी हस्तगत करून अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीत ती अडकवून ठेवण्यासाठी;

प्राधिकृत करू शकेल.

(२) कोणत्याही क्षेत्राच्या संबंधात पोटकलम (१) खाली काढलेल्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करावयाचा कालावधी प्रथमतः नव्वद दिवसांपेक्षा जास्त असणार नाही, मात्र अशा क्षेत्रात, पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे सार्वजनिक शांततेचा आणि प्रशांततेचा असा भंग किंवा त्याचा निकटवर्ती धोका चालू आहे आणि अशा क्षेत्रात शस्त्रांच्या वापराचा अंतर्भाव असलेल्या अपराधांना प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक किंवा समयोचित आहे असे केंद्र शासनाचे मत असेल तर, ते शासन असा कालावधी वेळोवेळी, कोणत्याही एका वेळी जास्तीत जास्त नव्वद दिवसांच्या कोणत्याही कालावधीने वाढविण्यासाठी अशी अधिसूचना विशोधित करू शकेल.

(३) 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) यामधील, झडती आणि अभिग्रहण याच्यासंबंधीचे उपबंध, पोटकलम (१) खाली केलेल्या कोणत्याही झडतीला किंवा अभिग्रहणाला शक्य तितपत लागू होतील.

(४) या कलमाच्या प्रयोजनासाठी—

(क) "शस्त्रे" यामध्ये दारूगोळ्याचा समावेश होतो;

(ख) "सार्वजनिक ठिकाण" म्हणजे, लोकांच्या किंवा कोणत्याही लोकवर्गाच्या वापरासाठी उद्देशित असलेले किंवा त्यांना प्रवेशसुलभ असलेले कोणतेही ठिकाण होय;

(ग) मूलतः पोटकलम (१) खाली काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेला कोणताही कालावधी पोटकलम (२) अन्वये वाढविण्यात आला असेल अशा बाबतीत, अशा अधिसूचनेच्या संबंधात, पोटकलम (१) मधील "अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेला कालावधी" हा निर्देश म्हणजे अशा प्रकारे वाढविण्यात आलेल्या कालावधीचा निर्देश होय असा त्याचा अर्थ लावण्यात येईल.]

## प्रकरण ५ वे

### अपराध व शास्ती

२५. [1][ (१) जो कोणी,--

विवक्षित अपराधांबद्दल शिक्षा.

(क) कलम ५ चे व्यतिक्रमण करून कोणतीही शस्त्रे किंवा दारूगोळा यांची निर्मिती, विक्री, हस्तांतरण, रूपांतरण, दुरुस्ती, चाचणी करील किंवा ती वापरून दाखविल, अथवा ती विक्रीसाठी मांडील अथवा विकत देण्याची किंवा हस्तांतरित करण्याची तयारी दाखवील, अथवा विक्री, हस्तांतरण, रूपांतरण, दुरुस्ती, चाचणी करण्यासाठी किंवा ती वापरून दाखविण्यासाठी आपल्या कब्जात ठेवील, किंवा

(ख) कलम ६ चे व्यतिक्रमण करून अग्निशस्त्राची नळी आखूड करील किंवा नकली अग्निशस्त्राचे खऱ्याखुऱ्या अग्निशस्त्रात रूपांतर करील ; किंवा

[2]* * * *

(घ) कलम ११ चे व्यतिक्रमण करून कोणत्याही वर्गाची किंवा वर्णनाची कोणतीही शस्त्रे किंवा दारूगोळा भारतात आणील किंवा तेथून बाहेर नेईल ;

तो, ज्याची मुदत कमीत कमी तीन वर्षे असेल, परंतु जास्तीत जास्त सात वर्षे असू शकेल अशा कारावासाच्या शिक्षेस पात्र ठरेल आणि तसेच द्रव्यदंडासही पात्र होईल.

[3][ (१क) जो कोणी कलम ७ चे व्यतिक्रमण करून कोणतोही मनाई केलेली शस्त्रे किंवा मनाई केलेला दारूगोळा संपादन करील, आपल्या कब्जात ठेवील किंवा बरोबर बाळगील तो ज्याची मुदत कमीत कमी पाच वर्षे असेल, परंतु जी १० वर्षांपर्यंत वाढविता येईल अशा कारावासाच्या शिक्षेस आणि द्रव्यदंडासही पात्र होईल.

(१कक) कलम ७ चे व्यतिक्रमण करून कोणतीही मनाई केलेली शस्त्रे किंवा मनाई केलेला दारूगोळा, यांची निर्मिती, विक्री, हस्तांतरण, रूपांतरण, दुरुस्ती, चाचणी करील वा वापरून दाखवील अथवा विक्रीकरिता मांडील अथवा विकत देण्याची वा हस्तांतरित करण्याची तयारी दाखवील अथवा विक्री, हस्तांतरण, रूपांतरण, दुरुस्ती, चाचणी करण्यासाठी वा वापरून दाखविण्यासाठी आपल्या कब्जात ठेवील तो सात वर्षांपेक्षा कमी नाही परंतु आजीव कारावासापर्यंत वाढविता येईल, अशा कारावासाच्या शिक्षेस आणि द्रव्यदंडासही पात्र होईल.]

[3][ (१ककक) जो कोणी, कोणतीही शस्त्रे किंवा दारूगोळा, कलम २४क अन्वये काढलेल्या अधिसूचनेचे व्यतिक्रमण करून आपल्या कब्जात ठेवील किंवा कलम २४ख खाली काढलेल्या अधिसूचनेचे व्यतिक्रमण करून ते बरोबर बाळगील किंवा अन्य प्रकारे आपल्या कब्जात ठेवील तो, ज्याची मुदत कमीत कमी [4][तीन वर्षे असेल, परंतु जास्तीत जास्त सात वर्षे] असू शकेल अशा कारावासाच्या शिक्षेस पात्र ठरेल आणि तसेच द्रव्यदंडासही पात्र होईल.

(१ख) जो कोणी,—

(क) कलम ३ चे व्यतिक्रमण करून कोणतेही अग्निशस्त्र किंवा दारूगोळा संपादन करील आपल्या कब्जात ठेवील किंवा बरोबर बाळगील; किंवा

(ख) कलम ४ खालील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही ठिकाणी, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या वर्गापैकी किंवा तशा वर्णनाची कोणतीही शस्त्रे त्या कलमाचे व्यतिक्रमण करून संपादन करील किंवा आपल्या कब्जात ठेवील किंवा बरोबर बाळगील ; किंवा

(ग) कलम ८, पोटकलम (२) द्वारे आवश्यक करण्यात आल्याप्रमाणे ज्या अग्निशस्त्रावर बनविणाऱ्याचे नाव, निर्माणकाचा क्रमांक किंवा अन्य ओळखचिन्ह ठसवलेले किंवा अन्यथा दर्शविण्यात आलेले नाही असे कोणतेही अग्निशस्त्र विकेल किंवा हस्तांतरित करील ; किंवा

(घ) स्वतः, कलम ९, पोटकलम (१), खंड (क), उप खंड (दोन) किंवा उप खंड (तीन) जिला लागू होतो अशी व्यक्ती असेल व त्या कलमाचे व्यतिक्रमण करून कोणतेही अग्निशस्त्र किंवा दारूगोळा संपादन करील, आपल्या कब्जात ठेवील किंवा बरोबर बाळगील ; किंवा

(ङ) कलम ९, पोटकलम (१), खंड (ख) चे व्यतिक्रमण करून कोणत्याही अग्निशस्त्राची किंवा दारूगोळ्याची विक्री किंवा हस्तांतरण करील किंवा रूपांतर, दुरुस्ती, चाचणी करील किंवा ती वापरून दाखवील ; किंवा

---

१. १९८३ चा अधिनियम क्र. २५, कलम ८ द्वारे मूळ पोटकलम (१) ऐवजी घातले (२२ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

२. १९८८ चा अधिनियम क्र. ४२ (क्) क५, द्वारे खंड (ग्) वगळण्यात आला (१ सप्टेंबर, १९८८ रोजी व तेव्हापासून).

३. १९८८ चा अधिनियम क्र. ४२ ,कलम ५ (ख) अन्वये पोटकलम १क ला '१ककक' असा नवीन क्रमांक देण्यात आला आणि १ककक या नवीन क्रमांकाच्या पोटकलमाआधी ही पोटकलमे घालण्यात आली (१ सप्टेंबर, १९८८ रोजी व तेव्हापासून).

४. १९८५ चा अधिनियम क्र. ३९, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले.

(च्) कलम १० चे व्यतिक्रमण करून कोणतीही शस्त्रे किंवा दारूगोळा भारतात आणील किंवा तेथून बाहेर नेईल; किंवा

(छ) कलम १२ चे व्यतिक्रमण करून कोणतीही शस्त्रे किंवा दारूगोळा यांची वाहतूक करील; किंवा

(ज्) कलम ३ चे पोटकलम (२) किंवा कलम २१ चे पोटकलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे शस्त्रे किंवा दारूगोळा निक्षेप करण्यात कसूर करील; किंवा

(झ) स्वतः शस्त्रे किंवा दारूगोळा बनवणारा किंवा त्यांचा व्यापारी असून, कलम ४४ खाली केलेल्या नियमांद्वारे आवश्यक केल्याप्रमाणे अभिलेख किंवा हिशेब ठेवण्यात किंवा अशा नियमांद्वारे आवश्यक केल्याप्रमाणे त्यात अशा सर्व नोंदी करण्यात कसूर करील अथवा त्यात उद्देशपूर्वक खोटी नोंद करील अथवा अशा अभिलेखाचे किंवा हिशेबाचे निरीक्षण करण्यास किंवा त्याच्या नकला काढण्यास किंवा त्यातून नोंदी घेण्यास प्रतिबंध करील किंवा अडथळा आणील अथवा जेथे शस्त्रे किंवा दारूगोळा यांची निर्मिती करण्यात येते किंवा तो ठेवण्यात येतो अशा कोणत्याही परिवास्तुमध्ये किंवा अन्य ठिकाणी प्रवेश करण्यास प्रतिबंध करील किंवा अडथळा आणील अथवा अशी शस्त्रे किंवा दारूगोळा प्रदर्शित करण्यात उद्देशपूर्वक कसूर करील किंवा ती लपवून ठेवील अथवा त्यांची निर्मिती कोठे करण्यात येते किंवा ती कोठे ठेवण्यात येतात ते निर्देशित करण्याचे नाकारील;

तो, ज्याची मुदत कमीत कमी [१][ एक वर्ष ] असेल, परंतु जास्तीत जास्त तीन वर्षे असू शकेल अशा कारावासाच्या शिक्षेस पात्र ठरेल आणि तसेच द्रव्यदंडासही पात्र होईल :

परंतु, न्यायालय कोणत्याही पुरेशा आणि विशेष कारणांस्तव, ती कारणे न्यायनिर्णयात नमूद करून [१][ एक वर्षापेक्षा ] कमी मुदतीची कारावासाची शिक्षा ठोठावू शकेल. ]

[२][(१ग) पोटकलम (१ख) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जो कोणी कोणत्याही अशांत क्षेत्रात त्या पोटकलमाखाली शिक्षायोग्य असलेला कोणताही अपराध करील, तो ज्याची मुदत कमीत कमी तीन वर्षे असेल परंतु जास्तीत जास्त सात वर्षे असू शकेल अशा कारावासाच्या शिक्षेस पात्र ठरेल आणि तसेच द्रव्यदंडासही पात्र होईल.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनासाठी, "अशांत क्षेत्र" म्हणजे, अंदाधुंदीला आळा घालून सार्वजनिक सुव्यवस्था पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी आणि ती टिकवण्यासाठी उपबंध करणाऱ्या, त्या त्या वेळी अंमलात असणाऱ्या कोणत्याही अधिनियमितीअन्वये "अशांत क्षेत्र" म्हणून घोषित केलेले कोणतेही क्षेत्र आणि त्यात कलम २४क किंवा २४ख खालील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही क्षेत्राचा समावेश होतो.

(२) स्वतः कलम ९, पोटकलम (१), खंड (क्), उपखंड (एक) जिला लागू होतो अशी व्यक्ती असून, जो कोणी, त्या कलमाचे व्यतिक्रमण करून कोणतेही अग्निशस्त्र किंवा दारूगोळा संपादन करील, आपल्या कब्जात ठेवील किंवा बरोबर बाळगील तो, एक वर्षपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

[३][(३) जो कोणी, कलम ५, पोटकलम (२) च्या परंतुकातील खंड (क्) किंवा खंड (ख्) यांच्या उपबंधांचे व्यतिक्रमण करून, कोणत्याही अग्निशस्त्राची, दारूगोळ्याची किंवा इतर शस्त्रांची विक्री किंवा हस्तांतरण,—

(एक) अधिकारिता असणाऱ्या जिल्हा दंडाधिकाऱ्याला किंवा सर्वांत जवळच्या पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याला, त्या अग्निशस्त्राची, दारूगोळ्याची किंवा इतर शस्त्रांची नियोजित विक्री किंवा हस्तांतरण याबाबतची माहिती कळविल्याशिवाय; किंवा

(दोन) अशा जिल्हा दंडाधिकाऱ्याला किंवा त्या पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याला अशी माहिती दिल्याच्या तारखेपासून पंचेचाळीस दिवसांचा कालावधी समाप्त होण्यापूर्वी;

करील तो, सहा महिनेपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासास, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल. ]

(४) लायसनामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या शर्तीमध्ये बदल करण्याकरता, कलम १७, पोट-कलम (१) खाली लायसन प्राधिकरणाने लायसन स्वाधीन करण्याची आज्ञा केली असता तसे करण्याच्या कामी किंवा त्यांचे निलंबन किंवा प्रत्याहरण करण्यात आल्यावर, ते लायसन त्या कलमाच्या पोटकलम (१०) खाली समुचित प्राधिकरणाकडे परत करण्याच्या कामी जो कोणी कसूर करील तो, सहा महिने-पर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासास, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या रकमेच्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

---

१. १९८५ चा अधिनियम क्र. ३९, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

२. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे समाविष्ट केले.

३. १९८३ चा अधिनियम क्र. २५, कलम ८ द्वारे मूळ पोटकलम (३) ऐवजी हे पोटकलम दाखल केले (२२ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

(५) कलम १९ खाली आपले नाव व पत्ता देण्याची आज्ञा करण्यात आली असता जो कोणी असे नाव व पत्ता देण्याचे नाकारील किंवा ज्याने असे नाव व पत्ता दिला असता तो खोटा असल्याचे नंतर उघडकीस येईल, तो सहा महिनेपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासास, किंवा शंभर रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या रकमेच्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

[1][२६. (१) जो कोणी, कलमे ३, ४, १० किंवा १२ यांच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करून, अशा रीतीने एखादी कृती करील की, ज्यायोगे अशी कृती कोणत्याही लोकसेवकाला अथवा रेल्वेगाडी, वायुयान, जलयान, वाहन किंवा वाहतुकीचे अन्य कोणतेही साधन यांच्या ठिकाणी नेमलेल्या किंवा काम करत असलेल्या कोणत्याही व्यक्तीला ते कळू नये असा उद्देश दिसून येईल तो, ज्याची मुदत कमीत कमी सहा महिने असेल, परंतु जास्तीत जास्त सात वर्षे असू शकेल अशा कारावासास आणि तसेच द्रव्यदंडासही पात्र होईल.

चोरटे व्यतिक्रमण.

(२) जो कोणी, कलमे ५, ६, ७ किंवा ११ यांच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करून, अशा रीतीने एखादी कृती करील की, ज्यायोगे अशी कृती कोणत्याही लोकसेवकाला अथवा रेल्वेगाडी, वायुयान, जलयान, वाहन किंवा वाहतुकीचे अन्य कोणतेही साधन यांच्या ठिकाणी नेमलेल्या किंवा काम करत असलेल्या कोणत्याही व्यक्तीला ते कळू नये असा उद्देश दिसून येईल तो, ज्याची मुदत कमीत कमी पाच वर्षे असेल परंतु, जास्तीत जास्त दहा वर्षे असू शकेल अशा कारावासास आणि तसेच द्रव्यदंडासही पात्र होईल.

(३) जो कोणी, कलम २२ खाली कोणतीही झडती घेण्यात येत असताना कोणतीही शस्त्र किंवा दारूगोळा लपवील किंवा लपविण्याचा प्रयत्न करील तो, दहा वर्षेपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासास, आणि तसेच द्रव्यदंडासही पात्र होईल.]

[2][२७. (१) कलम ५ चे व्यतिक्रमण करून, जो कोणी, कोणतीही शस्त्रे किंवा दारूगोळा यांचा वापर करील तो कमीत कमी तीन वर्षे परंतु सात वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासास आणि द्रव्यदंडासही पात्र होईल.

शस्त्रे, इत्यादी वापरण्याबद्दल शिक्षा.

(२) कलम ७ चे व्यतिक्रमण करून जो कोणी, कोणतीही मनाई केलेली शस्त्रे वा दारूगोळा यांचा वापर करील तो कमीत कमी सात वर्षे परंतु आजीव कारावासापर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासास आणि द्रव्यदंडासही पात्र असेल.

(३) कलम ७ चे व्यतिक्रमण करून जो कोणी, कोणतीही मनाई केलेली शस्त्रे वा दारूगोळा यांचा वापर करील किंवा कोणतीही कृती करील आणि असा वापर वा कृती अन्य कोणत्याही व्यक्तीच्या मृत्यूस कारणीभूत होईल त्याला मृत्यूची शिक्षा होईल.]

२८. जो कोणी, आपल्या किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या कायदेशीर अटकेचा किंवा स्थानबद्धतेचा प्रतिकार करण्याच्या किंवा त्यास प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने एखाद्या अग्निशस्त्रांचा किंवा नकली अग्निशस्त्रांचा कोणत्याही प्रकारे वापर करील किंवा करण्याचा प्रयत्न करील तो, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, [3][आणि द्रव्यदंडास] पात्र होईल.

विवक्षित प्रकरणी अग्निशस्त्रांचा किंवा नकली अग्निशस्त्रांचा वापर करण्याबद्दल व ती कब्जात ठेवण्याबद्दल शिक्षा.

**स्पष्टीकरण.**—या कलमातील "नकली अग्निशस्त्र" या शब्दप्रयोगास, कलम ६ मध्ये असलेलाच अर्थ आहे.

---

१. १९८३ चा अधिनियम क्र. २५, कलम ९ द्वारे मूळ कलम २६ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले (२२ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

२. १९८८ चा अधिनियम क्र. ४२, कलम ६ द्वारे कलम २७ ऐवजी हा मजकूर घालण्यात आला (१ सप्टेंबर, १९८८ रोजी व तेव्हापासून).

३. १९८३ चा अधिनियम क्र. २५, कलम १० द्वारे 'किंवा द्रव्यदंडास किंवा दोन्हीस' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२२ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

लायसन धारन न करणाऱ्या व्यक्तीकडून शस्त्रे इत्यादी जाणीवपूर्वक खरेदी करणे किंवा शस्त्रे इत्यादी कब्जात ठेवण्यास हक्कदार नसलेल्या व्यक्तीकडे ती जाणीवपूर्वक सुपूर्द करणे याबद्दल शिक्षा.

२९. जो कोणी,—

(क) विहित करण्यात येईल अशा वर्गापैकी किंवा वर्णनाची कोणतीही अग्निशस्त्रे किंवा अन्य कोणतीही शस्त्रे अथवा कोणताही दारूगोळा, अन्य एखाद्या व्यक्तीला कलम ५ खाली लायसन मिळालेले नाही किंवा प्राधिकृत करण्यात आलेले नाही हे माहीत असताना, अशा अन्य व्यक्तीकडून खरेदी करील ; किंवा

(ख) कोणतीही शस्त्रे किंवा दारूगोळा आपल्या कब्जात ठेवण्यास या अधिनियमाच्या किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या आधारे अन्य एखादी व्यक्ती हक्कदार आहे, आणि ती तशी कब्जात ठेवण्यास या अधिनियमाद्वारे किंवा अशा अन्य कायद्याद्वारे तिला मनाई करण्यात आलेली नाही याची अगोदर खातरजमा केल्याशिवाय तिच्याकडे ती सुपूर्द करील.

तो [1][तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षास] पात्र होईल.

लायसन किंवा नियम यांचे व्यतिक्रमण करण्याबद्दल शिक्षा.

३०. जो कोणी एखाद्या लायसनाच्या कोणत्याही शर्तीचे किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाचे व्यतिक्रमण करील आणि त्याकरिता या अधिनियमात अन्यत्र कोणत्याही शिक्षेचा उपबंध करण्यात आलेला नसेल तर, तो [2][सहा महिनेपर्यंत] असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा [3][दोन हजार रुपयांपर्यंत] असू शकेल एवढ्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

नंतरच्या पराधांबद्दल शिक्षा.

३१. या अधिनियमाखालील अपराधाबद्दल दोषी ठरवण्यात आलेल्या ज्या कोणास या अधिनियमाखाली पुन्हा दोषी ठरवण्यात येईल तो, नंतरच्या अपराधाकरिता उपबंधित केलेल्या दंडाच्या दुप्पट दंडास पात्र होईल.

अधिहरण करण्याची शक्ती.

३२. (१) कोणतीही शस्त्रे किंवा दारूगोळा यांच्याबाबतीत कोणत्याही व्यक्तीने केलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल या अधिनियमाखाली तिला दोषी ठरवण्यात आले असेल तेव्हा, अशी शस्त्रे किंवा दारूगोळा संपूर्णपणे किंवा त्यांचा कोणताही भाग, आणि ज्यामध्ये ती शस्त्रे किंवा दारूगोळा आहे असे किंवा ती लपवण्यासाठी वापरलेले असे कोणतेही जलयान, वाहन किंवा वाहतुकीचे अन्य साधन व असे कोणतेही पात्र किंवा वस्तू यांचे अधिहरण करण्याबाबत आणखी निदेश देणे हे दोषसिद्धी करणाऱ्या न्यायालयाच्या विवेकाधीन असेल :

परंतु, अपिलान्ती किंवा अन्यथा दोषसिद्धी रद्द ठरवण्यात आली तर, अधिहरण-आदेश शून्य होईल.

(२) हा अधिहरण-आदेश, अपील न्यायालय किंवा पुनरीक्षण करण्याच्या आपल्या शक्तींचा वापर करणारे उच्च न्यायालयदेखील देऊ शकेल.

कंपन्यांनी केलेले अपराध.

३३. (१) जेव्हा केव्हा या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीकडून घडला असेल तेव्हा, अपराध घडला त्यावेळी कंपनीच्या धंद्याच्या चालनाबाबत कंपनीची प्रभारी व तिला जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती, तसेच कंपनीही अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल आणि त्यांच्याविरुद्ध कार्यवाही होण्यास व त्यानुसार शिक्षा होण्यास त्या पात्र असतील :

परंतु, अपराध आपल्या नकळत घडला आणि असा अपराध घडू नये यासाठी आपण सर्व प्रकारे यथायोग्य तत्परता होती असे त्या व्यक्तीने शाबीत केले तर, या अधिनियमातील कशामुळेही अशी कोणतीही व्यक्ती या अधिनियमाखाली कोणत्याही शिक्षेस पात्र होणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर या अधिनियमाखालील अपराध कंपनीकडून घडला असेल आणि कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी यांच्या संमतीने किंवा मूकानुमतीने अपराध घडला आहे किंवा त्यांच्याकडून झालेल्या कोणत्याही हलगर्जीपणाशी त्या अपराधाचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा आहे असे शाबीत करण्यात आले तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्याविरुद्ध कार्यवाही होण्यास आणि त्यानुसार शिक्षा होण्यास तो पात्र असेल.

स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनांसाठी,—

(क) "कंपनी" याचा अर्थ कोणताही निगम-निकाय असा असून त्यामध्ये, पेढी किंवा अन्य व्यक्तिसंघ यांचा समावेश आहे ; आणि

(ख) "संचालक" याचा पेढीच्या संबंधातील अर्थ, पेढीतील भागीदार असा आहे.

---

१. १९८३ चा अधिनियम क्र. २५, कलम ११ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी घातले (२२ जून १९८३ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १२ द्वारे 'तीन महिनेपर्यंत' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला (२२ जून १९८३ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १२ द्वारे 'पाचशे रुपयांपर्यंत' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२२ जून १९८३ रोजी व तेव्हापासून).

## प्रकरण ६ वे

### संकीर्ण

३४. [1][' सीमाशुल्क अधिनियम, १९६२ ' (१९६२ चा ५२)] यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, त्या अधिनियमाच्या [1][कलम ५८ खाली] लायसन मिळालेल्या कोणत्याही वखारीत केंद्र शासनाच्या संमतीवाचून कोणतीही शस्त्रे किंवा दारूगोळा ठेवण्यात येणार नाहीत.

*शस्त्रे वखारीत ठेवण्यासाठी केंद्र शासनाची मंजुरी.*

३५. ज्यांच्याबाबतीत या अधिनियमाखाली कोणताही अपराध घडलेला आहे किंवा घडत आहे अशी कोणतीही शस्त्रे किंवा दारूगोळा वेगवेगळ्या व्यक्तींच्या संयुक्त ताब्यात किंवा संयुक्त नियंत्रणाखाली असलेल्या एखाद्या परिवास्तुत, वाहनात किंवा अन्य ठिकाणी सापडली किंवा सापडला असून त्या परिवास्तुत, वाहनात किंवा अन्य ठिकाणी शस्त्रे किंवा दारूगोळा असल्याबाबत अशांपैकी ज्या ज्या व्यक्तीला जाणीव होती असे समजण्यास कारण असेल ती प्रत्येक व्यक्तीविरुद्ध शाबीत न झाल्यास त्या अपराधाबद्दल तो जणु काही तिच्याकडूनच घडलेला असावा किंवा घडत असावा त्याप्रमाणे दायी असेल.

*विवक्षित प्रकरणी परिवास्तुच्या ताबाधारक व्यक्तींची अपराधविषयक जबाबदारी.*

३६. (१) या अधिनियमाखाली कोणताही अपराध घडल्याची जाणीव असणारी प्रत्येक व्यक्ती वाजवी सबब नसेल तर, त्याची खबर सर्वांत जवळच्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यास किंवा अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्यास देईल, व तशी सबब असल्यास तसे शाबीत करण्याचा भार अशा व्यक्तीवर राहील.

*विवक्षित अपराधांबाबत माहिती द्यावयाची.*

(२) रेल्वे, वायुयान, जलयान, वाहन किंवा वाहतुकीचे अन्य साधन यात कामाला असलेली किंवा काम करत असलेली प्रत्येक व्यक्ती, ज्यांच्या बाबतीत या अधिनियमाखाली अपराध घडलेला आहे किंवा घडत आहे अशी शस्त्रे किंवा दारूगोळा ज्यात असावा असा संशय घेण्यास तिला कारण असेल असा मार्गक्रमणात असलेला कोणताही खोका, आवेष्टन किंवा गासडी याविषयीची खबर सर्वात जवळच्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यास देईल.

३७. या अधिनियमात अन्यथा उपबंधित केले असेल ते खेरीजकरून,—

*अटक व झडत्या.*

(क) या अधिनियमाखाली किंवा त्याअन्वये केलेल्या नियमांखाली केलेल्या सर्व अटका व झडत्या यांची तामिली [2][' फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २)] यातील जे उपबंध त्या संहितेखाली केलेल्या अनुक्रमे अटकांच्या व झडत्यांच्या संबंधी असतील त्या उपबंधानुसार करण्यात येईल ;

(ख) दंडाधिकारी किंवा पोलीस अधिकारी नसलेल्या अशा व्यक्तीने या अधिनियमाखाली अटक केलेली कोणतीही व्यक्ती व हस्तगत केलेली कोणतीही शस्त्रे किंवा दारूगोळा सर्वांत जवळच्या पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याकडे विनाविलंब सुपूर्द करण्यात येईल आणि तो अधिकारी—

(एक) दंडाधिकाऱ्यासमोर हजर होण्यासाठी त्या व्यक्तीने जामीनदारांसह किंवा त्यांच्याविना बंधपत्र निष्पादित केल्यावर त्या व्यक्तीस सोडून देईल आणि त्या व्यक्तीने ताब्यात घेतलेल्या वस्तू, ती व्यक्ती दंडाधिकाऱ्यासमोर हजर होईपर्यंत आपल्या अभिरक्षेत ठेवील, किंवा

(दोन) त्या व्यक्तीने बंधपत्र निष्पादित करण्याच्या कामी आणि आवश्यक करण्यात आल्यास पुरेसे जामीनदार प्रस्तुत करण्याच्या कामी कसूर केली तर, ती व्यक्ती व त्या वस्तू दंडाधिकाऱ्यासमोर बिनाविलंब हजर करील.

३८. या अधिनियमाखालील प्रत्येक अपराध [2]['फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २)] याच्या अर्थानुसार दखली अपराध असेल.

*अपराध दखली असावयाचे.*

३९. कलम ३ खालील कोणत्याही अपराधासंबंधांत, जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीविना कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही अभियोग मांडला जाणार नाही.

*विवक्षित प्रकरणी जिल्हा दंडाधिकाऱ्याची पूर्वमंजुरी आवश्यक.*

४०. या अधिनियमाखाली सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरूद्ध कोणताही दावा, अभियोग किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

*सद्भावपूर्वक केलेल्या कृतीला संरक्षण.*

---

१. १९८३ चा अधिनियम २५, कलम १३ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला (२२ जून १९८३ रोजी व तेव्हापासून).

२. १९८३ चा अधिनियम २५, कलम १४ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला (२२ जून १९८३ रोजी व तेव्हापासून).

सूट देण्याची शक्ती.

४१. जर केंद्र शासनाच्या मते तसे करणे लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक किंवा समयोचित असेल तर, ते शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे व अधिसूचनेत ते विहित करील अशा कोणत्याही शर्ती असल्यास, त्यांच्या अधीनतेने,—

(क) या अधिनियमाच्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही उपबंधांच्या प्रवर्तनापासून, [१][कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तीवर्गास, (एकतर सरसकट किंवा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा वर्णनाच्या शस्त्रांच्या आणि दारूगोळ्यांच्या संबंधात) सूट देऊ शकेल], किंवा कोणत्याही वर्णनाची शस्त्रे किंवा दारूगोळा वगळू शकेल, किंवा भारताचा कोणताही भाग मुक्त करू शकेल; आणि

(ख) कितीही वेळा अशी कोणतीही अधिसूचना रद्द करू शकेल आणि पुन्हा तशाच अधिसूचनेद्वारे ती व्यक्ती किंवा तो व्यक्तीवर्ग किंवा त्या वर्णनाची शस्त्रे व दारूगोळा किंवा भारताचा तो भाग यांना अशा उपबंधांच्या प्रवर्तनास अधीन ठरवू शकेल.

अग्निशस्त्रांची गणती करण्याची शक्ती.

४२. (१) केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, कोणत्याही क्षेत्रातील सर्व अग्निशस्त्रांची गणती करण्याचा निदेश देऊ शकेल आणि अशी गणती करण्यासाठी शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याला शक्ती प्रदान करू शकेल.

(२) अशी कोणतीही अधिसूचना काढण्यात आल्यावर, ज्यांच्या कब्जात कोणतीही अग्निशस्त्रे आहेत अशा त्या क्षेत्रातील सर्व व्यक्ती, संबंधित अधिकाऱ्यास त्या संबंधात तो मागवील ती माहिती पुरवतील आणि त्याने तशी मागणी केल्यास अशी अग्निशस्त्रे त्याच्यापुढे हजर करतील.

प्रत्यायोजित करण्याची शक्ती.

४३. (१) कलम ४१ खालील शक्ती किंवा कलम ४४ खालील शक्ती वगळता या अधिनियमाखाली केंद्र शासनास वापरता येईल अशी कोणतीही शक्ती किंवा त्यास करता येईल असे एखादे कार्य असेल तेव्हा केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असे निदेशित करू शकेल की, ते अधिसूचनेत विनिर्दिष्ट करील अशा कोणत्याही बाबींच्या संबंधात व अशा कोणत्याही शर्ती असल्यास त्यांच्या अधीनतेने, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल,—

(क) असा केंद्र शासनास दुय्यम असलेला अधिकारी किंवा प्राधिकरण, किंवा

(ख) असे राज्य शासन किंवा त्या राज्य शासनास दुय्यम असलेला असा कोणताही अधिकारी किंवा प्राधिकरण

यांना देखील ती शक्ती वापरता येईल किंवा ते कार्य करता येईल.

(२) केंद्र शासनाने या अधिनियमाखाली केलेले कोणतेही नियम, कोणत्याही राज्य शासनाला किंवा त्यास दुय्यम अशा कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा प्राधिकरणाला अधिकार प्रदान करू शकतील किंवा कर्तव्ये नेमून देऊ शकतील किंवा अधिकार प्रदान करण्याबाबत किंवा कर्तव्ये नेमून देण्याबाबत प्राधिकृत करू शकतील.

नियम करण्याची शक्ती.

४४. (१) केंद्र शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्यासाठी नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेस बाध न येता, अशा नियमांमध्ये पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येईल, त्या अशा :—

(क) लायसन प्राधिकरणांची नियुक्ती, अधिकारिता, नियंत्रण व कार्याधिकार [२][—ती प्राधिकरणे ज्यांसाठी लायसन देऊ शकतात अशी क्षेत्रे आणि असे शस्त्रांचे आणि दारूगोळ्याचे प्रवर्ग यासुद्धा] ;

(ख) लायसनाच्या मंजुरीसाठी किंवा नवीकरणासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना व तपशील आणि लायसनाच्या नवीकरणासाठी अर्ज करावयाचा असेल तर तो किती मुदतीच्या आत करावा लागेल;

(ग) कोणत्या नमुन्यात व कोणत्या शर्तींच्या अधीनतेने कोणतेही लायसन मंजूर करावे लागेल, नाकारता येईल, त्याचे नवीकरण करता येईल, त्यात बदल करता येईल, ते निलंबित किंवा प्रत्याहृत करता येईल;

(घ) या अधिनियमात जेथे कोणताही कालावधी विनिर्दिष्ट करण्यात आलेला नसेल तेथे, कोणतेही लायसन कितीही कालावधीपुरते अंमलात असण्याचे चालू राहील;

(ङ) लायसनाच्या मंजुरीसाठी किंवा नवीकरणासाठी करावयाच्या कोणत्याही अर्जाच्या संबंधात किंवा मंजूर केलेल्या किंवा नवीकरण केलेल्या कोणत्याही लायसनाच्या संबंधात द्यावयाची फी आणि ती देण्याची रीत;

(च) अग्निशस्त्र बनवणाऱ्याचे नाव, त्याच्या निर्माणकाचा क्रमांक किंवा अन्य ओळखचिन्ह त्यावर कशा रीतीने ठसवण्यात येईल किंवा अन्यथा दर्शवण्यात येईल;

(छ) कोणत्याही अग्निशस्त्रांची चाचणी किंवा ती वापरून दाखवण्याची कार्यपद्धती;

(ज) प्रशिक्षण चालू असताना वापरता येतील ती अग्निशस्त्रे, ती ज्यांना वापरता येतील त्या व्यक्तींची वयोमर्यादा आणि अशा व्यक्तींनी त्यांचा वापर करण्यासंबंधातील शर्ती;

---

१. १९८३ चा अधिनियम क्र. २५, कलम १५ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला (२२ जून १९८३ रोजी व तेव्हापासून).

२. १९८३ चा अधिनियम २५, कलम १४ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला (२२ जून १९८३ रोजी व तेव्हापासून).

(झ) ज्याच्याकडे कलम १८ खाली अपिले करता येतील ते प्राधिकरण, अशा प्राधिकरणाने अनुसरावयाची कार्यपद्धती आणि ज्या कालावधीत अपिले करावी लागतील तो कालावधी, अशा अपिलासंबंधात द्यावयाची फी आणि अशा फीचा परतावा;

(ञ) कलम ३ किंवा कलम ४ खालील लायसन सोडून अन्य लायसनाखाली केलेल्या कोणत्याही गोष्टींचे अभिलेख व हिशेब ठेवणे, असे अभिलेख किंवा हिशेब यांचा नमुना व त्यात करावयाच्या नोंदी आणि कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास किंवा या बाबतीत शक्ती प्रदान केलेल्या कोणत्याही शासकीय अधिकाऱ्यास असे अभिलेख किंवा हिशेब दाखवणे;

(ट) जेथे शस्त्रे किंवा दारूगोळा यांची निर्मिती करण्यात येते किंवा अशी शस्त्रे किंवा दारूगोळा यांची निर्मिती किंवा व्यापार करणाऱ्याने शस्त्रे किंवा दारूगोळा ठेवला असेल अशा कोणत्याही परिवास्तुमध्ये किंवा अन्य ठिकाणी, कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याने किंवा या बाबतीत शक्ती प्रदान केलेल्या कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याने प्रवेश करून पाहणी करणे व अशा अधिकाऱ्यास ती शस्त्रे किंवा दारूगोळा दाखविणे ;

(ठ) कलम २१-पोटकलम (१) द्वारे आवश्यक केल्याप्रमाणे एखाद्या लायसनधारक व्यापाऱ्याकडे किंवा पथक शस्त्रागारात शस्त्रे किंवा दारूगोळा कोणत्या शर्तींच्या अधीनतेने निक्षेपित करता येईल आणि अशा प्रकारे निक्षेपित केलेल्या वस्तू किती कालावधी संपल्यावर समपहृत करता येतील;

(ड) विहित करावयाची किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते सत्रासीन असताना एका सत्राने किंवा [1][दोन अगर अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीपर्यंत ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर,] त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले, किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, तो नियम त्यानंतर अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

४५. पुढील गोष्टींस या अधिनियमातील काहीही लागू होणार नाही,— विवक्षित प्रकरणी अधिनियम लागू व्हावयाचा नाही.

(क) कोणत्याही समुद्रगामी जलयानावर किंवा वायुयानावर असलेली आणि अशा जलयानाच्या किंवा वायुयानाच्या सर्वसामान्य युद्धसामग्रीचा भाग असलेली शस्त्रे व दारूगोळा;

(ख) (एक) केंद्र शासनाच्या आदेशान्वये किंवा त्याखाली, किंवा

(दोन) लोकसेवकाने असा लोकसेवक म्हणून आपले कर्तव्य बजावण्याच्या ओघात, किंवा

(तीन) 'राष्ट्रीय छात्र सेना अधिनियम, १९४८' (१९४८ चा ३१) याखाली उभारलेल्या व राखलेल्या राष्ट्रीय छात्र सेनेच्या सदस्याने, किंवा 'स्थल सेना अधिनियम, १९४८' (१९४८ चा ५६) याखाली उभारलेल्या व राखलेल्या स्थलसेनेच्या अधिकाऱ्याने किंवा त्यात नाव नोंदलेल्या व्यक्तीने अथवा कोणत्याही केंद्रीय अधिनियमाखाली उभारण्यात व राखण्यात आलेल्या किंवा यानंतर उभारण्यात व राखण्यात येईल अशा कोणत्याही सेनेच्या कोणत्याही सदस्याने किंवा केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अन्य सेनेच्या कोणत्याही सदस्याने, असा सदस्य, अधिकारी किंवा नाव नोंदलेली व्यक्ती म्हणून आपली कामगिरी बजावण्याच्या ओघात, शस्त्रे किंवा दारूगोळा यांचे संपादन करणे, ती कब्जात ठेवणे किंवा आपल्याबरोबर बाळगणे, त्यांची निर्मिती, दुरुस्ती, रूपांतर किंवा चाचणी करणे किंवा ती वापरून दाखवणे, त्यांची विक्री किंवा हस्तांतरण करणे किंवा आयात, निर्यात किंवा वाहतूक करणे;

(ग) जे दुरुस्त करूनही वा न करताही अग्निशस्त्र म्हणून वापरता येण्याजोगे नाही असे अप्रचलित नमुन्याचे किंवा पुरातत्व दृष्टया मोलाचे किंवा नादुरूस्त स्थितीतील कोणतेही आयुध;

(घ) एखाद्या व्यक्तीने किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीने संपादन केलेल्या किंवा कब्जात ठेवलेल्या संपूरक भागांसह वापरण्याचे उद्देशित नसलेल्या शस्त्रांचे किंवा दारूगोळ्याचे किरकोळ भाग त्या व्यक्तीने संपादन करणे, ते कब्जात ठेवणे किंवा बरोबर बाळगणे.

४६. (१) 'भारतीय शस्त्र अधिनियम, १८७८' (१८७८ चा ११) हा याद्वारे निरसित करण्यात आला आहे.

(२) 'भारतीय शस्त्र अधिनियम, १८७८' (१८७८ चा ११) याचे निरसन झाले असले तरी आणि 'सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७' (१८९७ चा १०) याची कलमे ६ व २४ यांच्या उपबंधास बाध न येता, प्रथम उल्लेखलेल्या अधिनियमाखाली मंजूर केलेले किंवा नवीकरण केलेले आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी अंमलात असलेले प्रत्येक लायसन ज्याकरता ते मंजूर करण्यात किंवा नवीकृत करण्यात आले असेल अशा कालावधीपैकी राहिलेल्या मुदतीपर्यंत,—तत्पूर्वी ते प्रत्याहृत करण्यात आले नाही तर,—अशा प्रारंभानंतर अंमलात असण्याचे चालू राहील. १८७८ चा अधिनियम क्रमांक ११ याचे निरसन.

---

१. १९८३ चा अधिनियम क्र. २५, कलम १६ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी घातले (२२ जून १९८३ रोजी व तेव्हापासून).

# THE ARMS ACT, 1959

# शस्त्र अधिनियम, १९५९

## इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| acquisition | संपादन | [S. 2(1)(*a*)] |
| air rifle | हवाई रायफल | [S. 13(3)(*a*)(*ii*)] |
| ammunition | दारूगोळा | [S. 2(1)(*b*)] |
| arms | शस्त्रे | [S. 2(1)(*c*)] |
| artillery | तोफा | [S. 2(1)(*e*)(*i*)] |
| barrel | नळी | [S. 2(2)] |
| bombs | बॉंब | [S. 2(1)(*b*)(*i*)] |
| bonafide tourist | खराखुरा पर्यटक | [S. 10(*b*)] |
| bullet | गोळी | [S. 6-expl.] |
| carriages | गाड्या | [S. 2(1)(*e*)(*iv*)] |
| carry | बरोबर बाळगणे | [S. 3] |
| charges | बार | [S. 2(1)(*b*)(*iv*)] |
| criminal responsibility | अपराधविषयक जबाबदारी | [S. 35-m.n.] |
| deliver up | स्वाधीन करणे | [S. 17(1)] |
| deposit arms | शस्त्रे निक्षिप्त करणे | [S. 21(1)] |
| depositor | निक्षेपक | [S. 21(2)] |
| employed or working | कामाला असलेली किंवा काम करत असलेली | [S. 36(2)] |
| firearms | अग्निशस्त्रे | [S. 2(1)(*e*)] |
| firing | रंजक उडवणे | [S. 2(1)(*e*)(*ii*)] |
| flash | चकमकाट | [S. 2(1)(*e*)(*ii*)] |
| friction tubes | घर्षणनलिका | [S. 2(1)(*b*)(*v*)] |
| fulminating or fissionable material | स्फूर्जक किंवा विखंडनीय सामग्री | [S. 2(1)(*b*)(*iii*)] |
| fuses | पलिते | [S. 2(*b*) (*v*)] |
| grenades | स्फोटगोळे | [S. 2 (1) (*b*) (*i*)] |
| hand grenades | हातगोळे | [S. 2 (1) (*e*) (*i*)] |
| have in one's possession | स्वतःच्या कब्जात ठेवणे | [S. 3] |
| identification mark | ओळखचिन्ह | [S. 8 (1)] |
| immitation firearms | नकली अग्निशस्त्रे | [S. 6-expl.] |
| let on hire | भाड्याने देणे | [S. 2 (1) (*k*)] |
| licence | लायसन | [S. 3] |
| licensing authority | लायसन प्राधिकरण | [S. 2 (1)(*f*)] |
| magazine | कोठा | [S. 2 (1) (*i*) (*i*)] |
| maker | बनवणारा | [S. 8 (2)] |
| manufacturer | निर्माणक | [S. 8 (2)] |
| missiles | क्षेपणास्त्रे | [S. 2 (1) (*b*) (*i*)] |
| mounting artillery | तोफा चढवणे | [S. 2 (1) (*e*) (*iv*)] |
| muzzle | (बंदुकीचे) तोंड | [S. 2 (2)] |
| muzzle-loading gun | तोंडाकडून ठासावयाची बंदूक | [S. 13 (3) (*a*) (*i*)] |
| noxious liquid | अपायकारक द्रव्य | [S. 2 (1) (*b*) (*iii*)] |
| obsolete pattern | अप्रचलित नमुना | [S. 45 (*c*)] |
| of antiquarian value | पुरातत्त्व दृष्टया मोलाचे | [S. 45 (*c*)] |

| | | |
|---|---|---|
| part with possession | कब्जा देऊन टाकणे | [S. 2 (1) (*k*)] |
| platforms | मचाणी | [S. 2 (1) (*e*) (*iv*)] |
| projectiles | क्षेप्यके | [S. 2 (1) (*e*)] |
| rifle | रायफल | [S. 13 (3) (*ii*)] |
| riot pistols | दंगल-पिस्तुले | [S. 2 (1) (*e*) (*i*)] |
| rockets | अग्निबाण | [S. 2 (1) (*b*) (*i*)] |
| serviceable weapon | वापरयोग्य आयुध | [S. 2 (1) (*c*)] |
| serving artillery | तोफा डागणे | [S. 2 (1) (*e*) (*iv*)] |
| shells | कुलपी गोळे | [S. 2 (1) (*b*) (*i*)] |
| shot | छर्रा | [S. 6-expl.] |
| smooth bore gun | बिनआटयाची पोकळी असलेली बंदूक | [S. 13 (3) (*a*) (*i*)] |
| submarine mining | पाण्याखाली सुरूंग पेरणे | [S. 2 (1) (*b*) (*ii*)] |
| target practice | नेमबाजीचा सराव | [S. 13 (3) (*a*) (*ii*)] |
| test or prove | चाचणी करणे किंवा वापरून दाखवणे | [S. 5 (*a*)] |
| torpedo service | टॉर्पेडो वापरणे | [S. 2 (1) (*b*) (*ii*)] |
| trigger | घोडा | [S. 2 (1) (*i*) (*i*)] |
| unit armoury | पथक शस्त्रागार | [S. 21 (1)-expl.] |
| weapons for offences or defence | हल्ल्याची किंवा बचावाची आयुधे | [S. 2 (1) (*c*)] |

## शस्त्र अधिनियम, १९५९

## THE ARMS ACT, 1959

### मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अग्निबाण | rockets | [क. 2 (1)ख(*i*)] |
| अग्निशस्त्रे | firearms | [क. 2 (1) (ङ)] |
| अपायकारक द्रव | noxious liquid | [क. 2 (1) (ख) (*ii*)] |
| अप्रचलित नमुना | obsolete pattern | [क. 45 (ग)] |
| ओळखचिन्ह | identification mark | [क. 8 (1)] |
| कब्जा देऊन टाकणे | part with possession | [क. 2 (1) (ट)] |
| कामाला असलेली किंवा काम करत असलेली | employed or working | [क. 36 (2)] |
| कुलपी गोळे | shells | [क. 2 (1) (ख) (*i*)] |
| कोठा | magazine | [क. 2 (1) (झ) (*i*)] |
| खराखुरा पर्यटक | bonafide tourist | [क. 10 (ख)] |
| गाड्या | carriage | [क. 2 (1) (ङ) (*iv*)] |
| अपराध विषयक जबाबदारी | criminal responsibility | [क. 35- समास टिप] |
| गोळी | bullet | [क. 6-स्पष्टीकरण] |
| घर्षणनलिका | friction tubes | [क. 2 (1) (ख) (*v*)] |
| घोडा | trigger | [क. 2 (1) (झ) (*i*)] |
| चकमकाट | flash | [क. 2 (1) (ङ) (*ii*)] |
| चाचणी करणे किंवा वापरून दाखवणे | test or prove | [क. 5 (क)] |
| छर्रा | shot | [क. 6-स्पष्टीकरण] |
| टॉर्पेडो वापरणे | torpedo service | [क. 2 (1) (ख) (*ii*)] |
| (बंदुकीचे) तोंड | muzzle | [क. 2 (2)] |
| तोंडाकडून ठासावयाची बंदूक | muzzle-loading gun | [क. 13(3) (क) (*i*)] |
| तोफा | artillery | [क. 2 (1) (ङ) (*i*)] |
| तोफा चढवणे | mounting artillery | [क. 2 (1) (ङ) (*iv*)] |
| तोफा डागणे | serving artillery | [क. 2 (1) (ङ) (*iv*)] |
| दंगल-पिस्तुले | riot pistols | [क. 2 (1) (ङ) (*i*)] |

| | | |
|---|---|---|
| दारूगोळा | ammunition | [क. 2 (1) (ख)] |
| नकली अग्निशस्त्रे | imitation firearms | [क. 6-स्पष्टीकरण] |
| नळी | barrel | [क. 2 (2)] |
| निर्माणक | manufacturer | [क. 8 (2)] |
| निक्षेपक | depositor | [क. 21 (2)] |
| नेमबाजीचा सराव | target practice | [क. 13 (3) (ख) (*ii*)] |
| पथक शस्त्रागार | unit armoury | [क. 21 (1)-स्पष्टीकरण] |
| पलिते | fuses | [क. 2 (ख) (*v*)] |
| पाण्याखाली सुरुंग पेरणे | submarine mining | [क. 2 (1) (ख) (*ii*)] |
| पुरातत्त्व दृष्ट्या मोलाचे | of antiquarian value | [क. 45 (ग)] |
| बनवणारा | maker | [क. 8 (2)] |
| बरोबर बाळगणे | carry | [क. 3] |
| बार | charges | [क. 2 (1) (ख) (*iv*)] |
| बिनआटयाची पोकळी असलेली बंदूक | smooth bore gun | [क. 13 (3) (क) (*i*)] |
| बॉंब | bombs | [क. 2 (1) (ख) (*i*)] |
| भाड्याने देणे | let on hire | [क. 2 (1) (ट)] |
| मचाणी | platforms | [क. 2 (1) (ङ) (*iv*)] |
| रंजक उडवणे | firing | [क. 2 (1) (ङ) (*ii*)] |
| रायफल | rifle | [क. 13 (3) (*ii*)] |
| लायसन | licence | [क. 3] |
| लायसन प्राधिकरण | licensing authority | [क. 2 (1) (च)] |
| वापरयोग्य आयुध | serviceable weapon | [क. 2 (1) (ग)] |
| शस्त्रे | arms | [क. 2 (1) (ग)] |
| शस्त्रे निक्षिप्त करणे | deposit arms | [क. 21 (1)] |
| संपादन | acquisition | [क. 2 (1) (क)] |
| स्फूर्जक किंवा विखंडनीय सामग्री | fulminating or fissionable material | [क. 2 (1) (ख) (*iii*)] |
| स्फोटगोळे | grenades | [क. 2 (1) (ख) (*i*)] |
| स्वत:च्या कब्जात ठेवणे | have in one 's possession | [क. 3] |
| स्वाधीन करणे | deliver up | [क. 17 (1)] |
| हल्ल्याची किंवा बचावाची आयुधे | weapons for offences or defence | [क. 2 (1) (ग)] |
| हवाई रायफल | air rifle | [क. 13 (3) (क) (*ii*)] |
| हातगोळे | hand-grenades | [क. 2 (1) (ङ) (*i*)] |
| क्षेपणास्त्रे | missiles | [क. 2 (1) (ख) (*i*)] |
| क्षेप्यके | projectiles | [क. 2 (1) (ङ)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई